सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २०८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | ınbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### टी-२० वर्ल्डकप तोंडावर असताना केन विल्यमसनचा निवृत्तीचा निर्णय



मुंबई : टी-२० वर्ल्डकप २०२६ जवळ येत असतानाच न्यूझीलंडचा दिग्गज फलंदाज केन विल्यमसन (३५) याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. भारत आणि श्रीलंका संयुक्तरित्या टी-२० वर्ल्डकप २०२६ चे आयोजन करणार आहेत. या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी विल्यमसनने घेतलेला निर्णय न्यूझीलंड संघासाठी मोठा धक्का मानला जात आहे. विल्यमसनने आतापर्यंत ९३ टी-२० सामने खेळत २५७५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याची सरासरी ३३ इतकी आहे. तो न्यूझीलंडच्या वतीने सर्वाधिक धावा करणारा टी-२० खेळाडू ठरला आहे. त्याच्या नावावर १८ अर्धशतक आणि ९५ ही सर्वोच्च धावसंख्या आहे. टी-२० क्रिकेटध्ये २०११ मध्ये पदार्पण करणाऱ्या विल्यमसनने ७५ सामन्यांमध्ये न्यूझीलंडचे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वात संघाने दोनदा टी-२० विश्वचषकाची उपांत्य फेरी (२०१६, २०२२) आणि एकदा अंतिम फेरी (२०२१) गाठली होती.

### नौदलासाठी इस्त्रोने प्रक्षेपित केला उपग्रह



श्रीहरिकोटा : भारतीय नौदलाठी इस्रोने LVM3-M5/CMS-03 या रॉकेटमधून एका उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले. या उपग्रहामुळे नौदलाची संपर्क यंत्रणा आणखी सक्षम होणार आहे. नागरी जहाज आणि नौदलाचे जहाज यांच्यात आवश्यकतेनुसार संपर्क ठेवणे तसेच या जहाजांमधील फरक ओळखून त्यांचे व्यवस्थित व्यवस्थापन करणे ही कामं आता आणखी प्रभावीरित्या होणार आहेत. इस्रोने रविवार २ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रक्षेपित केलेले रॉकेट ४३.५ मीटर लांबीचे आणि ६४२ टन वजनाचे आहे. याच रॉकेटच्या मदतीने चांद्रयान ३ मोहीम राबवण्यात आली. प्रक्षेपित केलेल्या रॉकेटमधून इस्रोने CMS-03 हा ४४०० किलो वजनाचा उपग्रह अंतराळात पाठवला. हा उपग्रह नौदलासाठी GS-T-7 ची जागा घेणार आहे. भारताने आतापर्यंत प्रक्षेपित केलेल्या संपर्कासाठीच्या उपग्रहांमध्ये CMS-03 हा सर्वात मोठा उपग्रह आहे.

### महाराष्ट्रासाठी पुढील २४ तास महत्त्वाचे!


मुंबई: मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशभरात पावसाच्या जोरदार सरी बरसत आहेत. नोव्हेंबर उजाडला तरी पावसाचे प्रमाण कमी होत नसल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. यात आता महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजामुळे प्रशासनाने पुन्हा एकदा अलर्ट जारी केला असून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा कायम असल्याने पुढील काही दिवस फक्त राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात पाऊस असण्याचे संकेत आहेत. ज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पश्चिम बंगाल, सिक्किम,बिहार या भागात जास्त पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच अंदमान निकोबार येथेही अतिमुसळधार पाऊस होणार आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून पाऊस सतत हजेरी लावताना दिसतोय.

### नागपुरातील विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन पुढे ढकलण्याची शक्यता

नागपूर, ०२ नोव्हेंबर : राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन अंदाजे दहा दिवसांनी पुढे ढकलले जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आगामी १५ डिसेंबर रोजी जिल्हा परिषद निवडणुकीचे मतदान होणार असल्याने हे मतदान संपल्यानंतरच अधिवेशनाची सुरुवात होईल, अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून नागपुरात सुरू होते अशी परंपरा आहे. परंतु, यंदा राज्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत. त्यामुळे बहुतांश पक्षांमधील नेते या निवडणुकांमध्ये व्यस्त राहणार आहेत. हे लक्षात घेता यंदा विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १० दिवस पुढे ढकलले जाऊ शकते असे बावनकुळे यांनी सांगितले. यापूर्वी, २०२१ मध्ये विधान परिषदेच्या निवडणुका १० डिसेंबरला झाल्या होत्या, तेव्हाही सर्व पक्षांनी अधिवेशन पुढे ढकलण्याची मागणी केली होती. यंदा राज्य विधीमंडळाचे अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरू होण्याची शक्यता होती. परंतु, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी राज्यभरात १५ तारखेला मतदान होणार आहे. त्यामुळे हे मतदान आटोपल्यानंतरच हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

## होबार्टमध्ये मारली बाजी : टीम इंडियाने साधली बरोबरी



होबार्ट : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या ढ२० मालिकेत भारताने बरोबरी साधली आहे. मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला. दुसरा सामना ऑस्ट्रेलियाने ४ विकेट राखून आणि तिसरा सामना भारताने ५ विकेट राखून जिंकला. ऑस्ट्रेलियाच्या सलामीवीर ट्रॅव्हिस हेड (सहा धावा), जोश इंगलिस (एक धाव) आणि मार्कस स्टोइनिस (६४ धावा) या तिघांना बाद करणारा अर्शदीप सिंग सामनावीर झाला.

नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेणे भारतासाठी फायद्याचे ठरले. होबार्ट येथील बेलेरिव्ह ओव्हल स्टेडियममध्ये झालेल्या तिसऱ्या ढ२० सामन्यात प्रथम फलंदाजी करत असलेल्या ऑस्ट्रेलियाने वीस षटकांत सहा बाद १८६ धावा केल्या. धावांचा पाठलाग करणाऱ्या भारताने १८.३ षटकांत पाच बाद १८८ धावा केल्या. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ४९ आणि यष्टीरक्षक असलेल्या जीतेश शर्माने नाबाद २२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. वॉशिंग्टन सुंदरने २३ चेंडूत चार षटकार आणि तीन चौकारांच्या जोरावर नाबाद ४९ धावा केल्या तर जीतेश शर्माने १३ चेंडूत ३ चौकार मारत नाबाद २२ धावा केल्या. टीम इंडियाकडून अभिषेक शर्माने २५, शुभमन गिलने १५, सूर्यकुमार यादवने २४, तिलक वर्माने २९, अक्षर पटेलने १७ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून नॅथन एलिसने ३, झेवियर बार्टलेटने १ आणि मार्कस स्टोइनिसने १ विकेट घेतली.

याआधी प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने वीस षटकांत सहा बाद १८६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने सहा, मिचेल मार्शने ११, जोश इंगलिसने एक, टिम डेव्हिडने ७४, मिचेल ओवेनने शून्य, मार्कस स्टोइनिसने ६४, मॅथ्यू शॉर्टने नाबाद २६, झेवियर बार्टलेटने नाबाद तीन धावांचे योगदान दिले. भारताकडून अर्शदीप सिंगने तीन, वरुण चक्रवर्तीने दोन, शिवम दुबेने एक बळी घेतला.

### कोणाचेही अर्धशतक नाही पण सर्वाधिक धावांचा यशस्वी पाठलाग

१९७ इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडिज ब्रिस्टल २०२५ (एचएस जोस बटलर ४७), १८७ भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियन होबार्ट २०२५ (एचएस वॉशिंग्टन सुंदर ४९), १७९ ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका केपटाऊन २०१६ (एचएस स्टीव्हन स्मिथ ४४), होबार्टमध्ये सहा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचा पहिला पराभव.

### ऑस्ट्रेलियातील सर्वाधिक यशस्वी टी-२० आंतरराष्ट्रीय धावांचा पाठलाग

१९८ भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सिडनी २०१६, १९५ भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सिडनी २०20, १८७ भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया होबार्ट २०२५,१७७ आयर्लंड विरुद्ध स्को होबार्ट २०२२, १७४ श्रीलंका विरुद्ध ऑस्ट्रेलिया जिलोंग २०१७.

# ५५ देशांच्या युद्धनौकांचे भारताच्या समुद्रात होणार शक्तीप्रदर्शन

## पाच दिवसांचा संयुक्त अभ्यास, शस्त्र पाहणी

नवी दिल्ली : सध्याच्या भारत-पाकिस्तान, अफगाणिस्तान-पाकिस्तान, अमेरिका-भारत, अमेरिका-रशिया-युक्रेन, इस्रायल-इराण, इस्रायल-गाझा अशा युद्धांनी जगभरात तणाव असताना ५५ देशांच्या शक्तीशाली युद्धनौका आणि पाणबुड्या भारताच्या समुद्रात दाखल होणार आहेत. यात अमेरिका, रशियादेखील असणार आहे. जगाला भारताची ताकद दाखवण्याची वेळ आली असून पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये पाच दिवसांचा संयुक्त अभ्यास, शस्त्र पाहणी केली जाणार आहे.

भारतीय नौदल फेब्रुवारी २०२६ मध्ये विशाखापट्टणम येथे तीन मोठे आंतरराष्ट्रीय सागरी कार्यक्रम एकाच वेळी आयोजित करणार आहे. 'मिलन २०२६' हा बहुराष्ट्रीय नौदल युद्धसराव १९ ते २६ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान विशाखापट्टणम येथे होणार आहे. या सरावात ५५ देशांचे नौदल सहभाग घेणार आहेत. १९ आणि २० फेब्रुवारी रोजी 'हार्बर फेज' नंतर, २१ ते २५ फेब्रुवारी दरम्यान बंगालच्या उपसागरात पाणबुडीविरोधी, हवाई आणि अत्याधुनिक सागरी ऑपरेशन्सचा 'सी फेज' आयोजित केला जाईल.



अमेरिकेसोबतच रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांची नौदले आपली विमानवाहू युद्धनौका, पाणबुड्या भारताच्या दिशेने पाठविणार आहेत. भारताने या भव्यदिव्य आयोजनाची तयारी सुरु केल्याचे नौदलाचे उपप्रमुख व्हाईस ॲडमिरल संजय वात्सायन यांनी सांगितले. मिलन २०२६ या मुख्य सरावाव्यतिरिक्त, भारतीय नौदल आणखी दोन महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे यजमानपद भूषवणार आहे. १८ फेब्रुवारी रोजी भारताचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या ताफ्याचे पुनरावलोकन केले जाईल. यात भारताची स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत पहिल्यांदाच सहभागी होणार आहे. सागरी सहकार्य वाढवण्यासाठी २००८ मध्ये स्थापन झालेल्या या 'आयओएनएस' परिषदेत नौदल प्रमुख एकत्र येऊन चर्चा करतील. या वेळी भारत २०२५ ते २०२७ साठी या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारणार आहे.

## ट्रेन तिकीटांच्या बुकींग नियमांत मोठा बदल

### आता याच लोकांना मिळणार लोअर बर्थ



नवी दिल्ली : रेल्वे प्रवाशांची सुविधा लक्षात घेऊन तिकीट बुकींगच्या प्रक्रीयेला अधिक सोपी आणि पारदर्शक बनवण्यासाठी अनेक महत्वाचे बदल केले जात आहेत. रेल्वेने 'रेल्वेवन' नामक एक सुपर ॲप लाँच केले आहे. हे ॲप प्रवाशांच्या एक वन-स्टॉप सॉल्यूशन रुपात कार्य करते. ज्याच्या माध्यमातून आरक्षित तसेच अनारक्षित तिकीट देखील बुक करता येणार आहे.

याशिवाय या ॲपवर ट्रेनची लाईव्ह स्थिती, प्लॅटफॉर्मची माहिती आणि अन्य सेवा देखील उपलब्ध आहेत. अनेकदा प्रवाशांची तक्रार असते की 'लोअर बर्थ प्रेफरेंस' निवडूनही त्यांना साईड अपर, मिडील वा अपर बर्थ दिली जाते. या समस्येवर उत्तर शोधण्यासाठी रेल्वेने एक नवीन व्यवस्था लागू केली आहे. रेल्वेच्या संगणकीकृत आरक्षण प्रणालीत ज्येष्ठ नागरिकांना, ४५ वर्षांहून अधिक वयाच्या महिला तसेच गर्भवती महिलांना लोअरबर्थ देण्याची विशेष व्यवस्था केलेली आहे. परंतू ही सुविधा आसनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते.

या शिवाय प्रवाशांच्या जवळ आता एक विशेष पर्याय असणार आहे. 'बुक ओनली इफ लोअर बर्थ इज अव्हेलेबल', म्हणजे जर लोअर बर्थ उपलब्ध नसेल तर तिकीट बुक होणार नाही. यामुळे प्रवाशांना त्यांच्या पसंतीनुसार आसन सुविधा मिळण्याची सोय उपलब्ध होईल.

जर बुकींगच्या वेळी लोअर बर्थ उपलब्ध नसेल आणि पात्र प्रवाशाला अपर वा मिडल बर्थ मिळाली असेल, तर आता टीटीईला अधिकार दिला गेला आहे की तो प्रवासादरम्यान रिकामी असलेली लोअर बर्थ तो अशा प्रवाशाला देऊ शकतो. रेल्वेने रिझर्व्ह कोचमध्ये झोपण्याच्या आणि बसण्याच्या वेळांसंदर्भात नियम स्पष्ट केले आहेत. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत झोपण्याची वेळ निर्धारित केलेली आहे. या दरम्यान प्रवासी आपल्या निर्धारित बर्थवर झोपू शकतात. परंतू दिवसा बर्थवर बसण्याची व्यवस्था असेल. आरएसी प्रवाशांसाठी ही व्यवस्था आहे की दिवसा साईड लोअर बर्थवर आरएसी प्रवासी आणि साईड अपर बर्थवर बुक प्रवासी बसू शकतात. परंतू रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत लोअर बर्थचा अधिकार केवळ लोअरबर्थ वाल्या प्रवाशाचा राहील. रेल्वेने आरक्षित तिकीटांची आगाऊ आरक्षण कालावधी (एआरपी) १२० दिवसांहून घटवून आता ६० दिवस केला आहे. आता प्रवासी प्रवास तारखेच्या केवळ ६० दिवस आधीपर्यंत तिकीट बुक करु शकतात. हा नियम १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू झाला आहे.



## दहावी-बारावी परिक्षा वेळापत्रक जाहीर; फेब्रुवारीत होणार परिक्षा

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. प्रायोगिक परीक्षा जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये घेतल्या जातील. अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ आहे.

बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्चपर्यंत चालणार आहे. दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होऊन १८ मार्च २०२६ रोजी संपणार आहे. बारावीच्या प्रायोगिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यांकन परीक्षा २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात येणार आहेत. या काळात विज्ञान शाखेच्या प्रायोगिक परीक्षा, वाणिज्य शाखेतील प्रोजेक्ट मूल्यांकन आणि कला शाखेतील तोंडी परीक्षा पूर्ण करण्यात येतील. दहावीच्या प्रायोगिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यांकन परीक्षा २ फेब्रुवारी ते बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडतील. विषयवार वेळापत्रक आणि सूचना मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर पाहता येतील, अशी माहिती मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी दिली.

### अतिविलंब शुल्कासह अंतिम मुदत जाहीर

शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी पात्र विद्यार्थ्यांसाठी नोंदणी अर्ज क्रमांक १७ सादर करण्यासंदर्भात महत्त्वाची सूचना जाहीर केली आहे. अतिविलंब शुल्कासह अर्ज भरण्याचा कालावधी १ नोव्हेंबर २०२५ ते ३१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे. अतिविलंब शुल्क म्हणून प्रति विद्यार्थी प्रति दिवस २० रुपये आकारण्यात येणार आहे. या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीनेच करावी लागेल. यासाठी www.mahahsscboard.in या वेबसाइटवर आवश्यक सर्व सूचना, माहितीपत्रक आणि मार्गदर्शक पुस्तिका उपलब्ध आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये लागणार आचारसंहिता

मुंबई: राज्यात सध्या सर्वांनाच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. त्यात न्यायालयाने निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका घ्याव्या असे आदेश दिले आहेत. त्यामुळे नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या आसपास निवडणुकांचे बिगूल वाजणार असल्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने कोणत्याही अधिकृत तारखा जाहीर केल्या नसल्या तरी राज्यातील सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.



मागील पाच वर्षांपासून महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर या निवडणुका लवकरच पार पडणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, पुढील आठवड्यात निवडणुकांच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता आहे. ५ किंवा ६ नोव्हेंबरला निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर होऊ शकते. यानंतर लगेच आचारसंहिता लागणार आहे.

तीन टप्प्यात निवडणुका होण्याची शक्यता

सूत्रांच्या माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात नगरपालिका, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आणि तिसऱ्या टप्प्यात महानगरपालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे.

## आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ : भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका फायनल

मुंबई : आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ मधला सर्वात मोठा सामना आज, रविवार २ नोव्हेंबर रोजी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळवला जाणार आहे. हा रोमांचक सामना नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर पार पडणार आहे. दोन्ही संघ फायनलसाठी सज्ज आहेत चला, या अंतिम लढतीआधी आपल्या भारतीय स्टार खेळाडूंबद्दल थोडं जाणून घेऊया



स्मृती मंधाना

भारतीय संघाची स्टार सलामी फलंदाज स्मृती मंधाना तिच्या जबरदस्त फलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे. तिच्या दमदार कामगिरीमुळेच ती 'रन मशीन' म्हणून ओळखली जाते. या वेळी ही ती उत्तम फॉर्ममध्ये आहे. जर फायनलमध्येही तिची बॅटिंग प्रभावी राहिली, तर भारताला विजय निश्चित मिळू शकतो. आत्तापर्यंतच्या सामन्यांमध्ये तिने ८ सामने खेळत ५५.५७ च्या सरासरीने ३८९ धावा झळकावल्या आहेत. सध्या ती सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे.

हरमनप्रीत कौर

भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्याकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत. या स्पर्धेत तिची बॅटिंग सातत्यपूर्ण राहिली आहे. सेमीफायनलमध्ये सुरुवातीच्या गडबडीनंतर तिने जेमिमा रॉड्रिग्जसह डाव सावरत संघाला मजबूत स्थितीत आणलं. आता सगळ्यांच्या नजरा फायनलमध्ये तिच्या बॅटिंगकडे असतील. हरमनप्रीतने ८ सामन्यांत ७ डावांतून ३४.२८ च्या सरासरीने २४० धावा केल्या आहेत. ऋचा घोष भारतीय संघातील पावर हिटर म्हणून ऋचा घोष ओळखली जाते. तिच्या आक्रमक फलंदाजीने जगभरातील क्रिकेटप्रेमी प्रभावित झाले आहेत. जर फायनलमध्ये तिच्या बॅटमधून चौकार-षटकारांचा पाऊस पडला, तर भारताच्या विजयाची शक्यता आणखी वाढेल. तिने ७ सामन्यांत ७ डावांतून ४०.२० च्या सरासरीने २०१ धावा केल्या आहेत, आणि तिचा स्ट्राइक रेट तब्बल १३२.२३ आहे.

दीप्ती शर्मा

दीप्ती शर्मा हा भारतीय संघाचा असा एक्का आहे, जी फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीत तितकीच प्रभावी आहे. ती फॉर्ममध्ये आली, तर भारताला कोणीही रोखू शकत नाही. तिने आतापर्यंत ८ सामन्यांत ६ डावांतून २६.१६ च्या सरासरीने १५७ धावा केल्या आहेत. गोलंदाजीत तिने ८ सामन्यांत २४.११ च्या सरासरीने १७ विकेट घेतल्या आहेत आणि सध्या ती सर्वाधिक विकेट घेणाऱ्या खेळाडूंमध्ये संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर आहे.

श्री चरणी

भारतीय संघातील युवा फिरकीपटू श्री चरणीने या स्पर्धेत आपल्या अप्रतिम गोलंदाजीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. तिने ८ सामन्यांत २६.०७ च्या सरासरीने १३ विकेट घेतल्या आहेत. तिच्याकडूनही फायनलमध्ये दमदार कामगिरीची अपेक्षा आहे. भारताच्या या पाच स्टार महिला खेळाडूंची कामगिरी आजच्या अंतिम सामन्यात निर्णायक ठरणार आहे. देशभरातील क्रिकेटप्रेमींच्या शुभेच्छा आणि अपेक्षा या 'ब्लू क्विन्स'सोबत आहेत.

## परमपूज्य बाबाजींच्या परंपरेच्या प्रचार प्रसारासाठी तीन संत २१ दिवस देशव्यापी दौऱ्यावर : राजेंद्र पवार



खुलताबाद प्रतिनिधी –जगद्गुरु श्री संत जनार्दन स्वामी मौनगिरी जी महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरणाच्या दिनांक २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर संपन्न होणाऱ्या सोहळ्याच्या पर्व काळावर जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्य परंपरेतील तीन संत ब्रह्मचारी विवेकानंद महाराज, नागेश्वर नंद महाराज व अविर मुक्तेश्वर महाराज हे २१ भारतातील सर्व हिंदू संस्कृती जगाच्या पाठीवर कशी श्रेष्ठ आहे बहुजन हिताय बहुजन सुखाय सर्वांना सोबत घेऊन चालणारी ही हजारो वर्ष पूर्वीची सनातन संस्कृती या संस्कृतीचे पालन संपूर्ण भारत देशासह जगाने हीचे अवलोकन करावं वसुदेव कुटुंबकम हे विश्वचि माझे घर हा माऊली ने दिलेला संदेश सध्याच्या जागतिक परिस्थितीमध्ये व आपल्या भारत भूमीमध्ये माहिती राजेंद्र पवार यांनी दिली

## ज़ाईस इंडिया ने जाईस व्हिजन सेंटरचे उद्घाटन

पुणे : १७८ वर्षांहून अधिक काळापासून ऑप्टिक्स आणि ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्समध्ये जागतिक स्तरावर अग्रणी असलेल्या ज़ाईस ला बापट ऑप्टिक्सच्या भागीदारीत पुण्यात त्यांचे दुसरे ज़ाईस व्हिजन सेंटर उघडण्याची घोषणा करताना अभिमान वाटतो. हे नवीन लाँच पुण्यातील आणि आसपासच्या समुदायांना अत्याधुनिक, प्रीमियम नेत्र काळजी उपाय प्रदान करण्याच्या ज़ाईस इंडियाच्या वचनबद्धतेला बळकटी देते.पुणे येथील कोथरूड येथील करिश्मा सोसायटीच्या समोर, कॅसाब्लांका येथील दुकान क्रमांक २, जी. ए. अप्पासाहेब कुलकर्णी पथ येथे स्थित, बापट ऑप्टिक्सचे १,००० चौरस फूट क्षेत्रफळाचे झेस व्हिजन सेंटर ग्राहकांना खरोखरच अत्याधुनिक चष्म्यांचा अनुभव देते. या केंद्रात प्रीमियम फ्रेम्सचा संग्रह आहे आणि ते प्रगत दृष्टी काळजी तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यामध्ये अचूक ३डी डिजिटल सेंटरेशनसाठी झेस व्हिसुफिट १००० आणि जलद आणि अचूक डोळ्यांच्या तपासणीसाठी झेस व्हिसुकोर ५०० यांचा समावेश आहे. या नवकल्पनांमुळे नेत्रतज्ज्ञांना प्रत्येकाच्या गरजांनुसार वैयक्तिकृत लेन्स सोल्यूशन्स वितरित करण्यास सक्षम केले जाते.

## सोयगाव येथील कै.बाबुरावजी काळे स्कूलचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२ नोव्हेंबर

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत कै. बाबुरावजी काळे स्कूलच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.तसेच दि.३१ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या अथेलेटिक्स स्पर्धामध्ये १०० मीटर रनिंग मध्ये कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूलच्या प्रथमेश मिसाळ याने चौदा वर्ष गटात दुसरा क्रमांक तर १७ वर्ष वयोगट ४ १०० रिले स्पर्धेत हर्षल शिनकर,विराज राऊत,तुषार बोडखे,भावेश खैरनार यांनी प्रथम क्रमांक पटकावला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अधक्षा ज्योतीताई काळे,सचिव देवीनाताई काळे-भटकर,संचालक शिवदीप काळे,सुनयना काळे,मुख्याध्यापक निलेश पाटील,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव,प्रा.कमलेश काळे, उपमुख्याध्यापक प्रा.ज्ञानेश्वर एलिस,प्रा.योगेश काळे, पर्यवेक्षक सागर घाटे,क्रीडाप्रेमी महेश मानकर,शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.हे विद्यार्थी आता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

# गुळमेश्वर शुगरच्या चौथ्या गळीत हंगामाला प्रारंभ




तभा वृत्तसेवा

पैठण दि ०२:- नवगाव ता. पैठण येथील गुळमेश्वर नॅचरल शुगर प्रा. लि. या गुळ कारखान्याचा २०२५-२६ गळीत हंगामाचा प्रारंभ छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपन भुमरे यांच्या हस्ते गव्हानीत मोळी टाकून नुकताच संपन्न झाला.

यावेळी कारखान्याचे चेअरमन,पवन बापूराव चव्हाण,कार्यकारी संचालक संजय खरात, बापूराव खराद,जनरल मॅनेजर भगवान पाटील,संचालक बद्रीनाथ थोटे, दामोदर वैद्य, भगवान वैद्य,लक्ष्मण चव्हाण जनसंपर्क अधिकारी परमेश्वर डांगे, लेखापाल निमेश सोनवणे,सतिष मोळे, अमोल काकडे, गणेश डांगे, किशोर करताडे, सुरक्षा रक्षक प्रमुख राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. हंगामाच्या सुरुवातीस सर्व शेतकऱ्यांना वेळेत ऊस गाळपासाठी आणण्याचे आवाहन गुळमेश्वर शुगर मिल तर्फे करण्यात आले. कारखाना व्यवस्थापनाने या वर्षी अधिक ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले असून शेतकऱ्यांना पारदर्शक दर आणि वेळेवर पेमेंटची हमी कारखान्यातर्फे देण्यात आली आहे.असे संचालक मंडळाच्या वतीने स्पष्ट कारण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, कामगार, ऊस तोडणी मुकादम मोठया संख्येने उपस्थित होते.

# रोटरी तर्फे कर्करोग प्रतिबंध, निदान व जागरूकता रॅली संपन्न




छत्रपती संभाजीनगर : शहरातील अकरा रोटरी क्लबच्या संयुक्त विद्यमाने आणि रोटरी माजी अध्यक्ष परिषद (कॉप्स) छत्रपती संभाजीनगर यांच्या पुढाकाराने कर्करोग प्रतिबंध, निदान व जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस पोलिस अधीक्षक ग्रामीण डॉ. विनयकुमार राठोड आणि शासकीय कर्करोग रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अरविंद गायकवाड यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

रोटरी संस्था गेली १२० वर्षे जगभर सामाजिक कार्यात योगदान देत असून सध्या २०० पेक्षा अधिक देशांतील ३५ हजार क्लब आणि १४ लाख सदस्य कार्यरत आहेत. रोटरी जिल्हा ३१३२ अंतर्गत छत्रपती संभाजीनगरसह महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील १०० पेक्षा जास्त क्लब व चार हजार सदस्य कार्यरत आहेत.

या वर्षी ऑक्टोबर महिना रोटरी जिल्हा ३१३२ मध्ये 'कर्करोग प्रतिबंध, निदान व जागरूकता महिना' म्हणून साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत दोन हजारांहून अधिक रोटरी सदस्य व नागरिकांनी महिलांमधील कर्करोग प्रतिबंधासाठी आर्थिक योगदान देत २० लाख रुपयांचा निधी 'द रोटरी फाउंडेशन'मध्ये जमा केला.

रोटरी जिल्हा ३१३२ अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, लातूर आणि सातारा येथे फिरते सुसज्ज कर्करोग निदान वाहन 'रोटरी आशा एक्स्प्रेस' कार्यरत आहेत. २०२७ पर्यंत आणखी पाच वाहने सुरू करण्याचा रोटरीचा मानस असून या प्रकल्पासाठी सुमारे तीन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

या उपक्रमाची सांगता शासकीय कर्करोग रुग्णालयातून निघालेल्या रॅलीद्वारे झाली. रॅलीच्या आयोजनात पोलिस प्रशासन, वाहतूक विभाग व केअर सिग्मा रुग्णालयाचे अमूल्य सहकार्य लाभले.

या यशस्वी आयोजनासाठी कॉप्स अध्यक्ष हेमंत लांडगे, सचिव अशोक तोष्णीवाल, सहाय्यक प्रांतपाल विवेक कानडे, भरत चोपडे, सरिता लोणीकर, सुरज डुमणे, डॉ. अमोल जोशी, हबिब शेख, रसिका पंतोजी, सागर तोलवानी, स्वाती स्मार्त आदींनी विशेष परिश्रम घेतले.

रोटरी व रोटरॅक्ट क्लबचे विविध अध्यक्ष व सदस्य तसेच ब्राझील येथून रोटरी युथ एक्सचेंज अंतर्गत आलेली यास्मिन हिचा सहभाग विशेष आकर्षण ठरला. छत्रपती संभाजीनगर शहरात आरोग्यविषयक जनजागृतीसाठी रोटरीचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

## रन फॉर युनिटी स्पर्धेला मोठा प्रतिसाद




तभा वृत्तसेवा

पैठण दि ०१ :- पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या संकल्पनेतून पोलीस स्टेशन पैठण तर्फे शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत ज्ञानेश्वर उद्यान राउंड असा रन फॉर युनिटी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त पाच किलोमीटर रनिंग स्पर्धेचे आयोजन कारण्यात आले.

या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद मिळाला. यात सिनिअर सिटीजन गटातून प्रथम अजय दिलीप लखोटिया, द्वितीय जनार्दन गरसुडे, तृतीय अँड प्रवीण बडे तर स. सा गटातून प्रथम रोहिदास कोल्हे,द्वितीय भागवत नाटकर, तृतीय प्रतीक नवगिरे तसेच मुलीनं मधून प्रथम समृद्धी उच्चे, द्वितीय वैष्णवी कुंदारे,तृतीय गीता वैरल यांनी क्रमांक पटकावला विजयी सर्वांना मेडल देऊन सम्मानित कारण्यात आले.


**लवाद प्राधिकरण**

**लवाद अधिकारी श्री अमित जी. चोरडिया**

(मल्टी-स्टेट को.ऑप.सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिट्रेशन अँड कन्सिलिएशन ॲक्ट १९९६ अन्वये)

**जाहीर नोटीस** दि.: ३०/१०/२०२५

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.(मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक),अहमदनगर पो.बॉक्स नं.-७, बँक रोड, अहमदनगर - अर्जदार

विरुध्द - खालील सामनेवाले

| लवाद अर्ज क्र.व सामनेवाला यांचे नाव | दावा रक्कम |
| --- | --- |
| लवाद अर्ज क्र. ४१/२०२५<br>१) सुभाष सूर्यभान पवार, रा. बीड बायपास, मु.पो. ता. जि. छत्रपती संभाजीनगर / रा. ४३-३-३०३, ऊर्जानगर, मु.पो. सातारा परिसर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.२३,७८,८९५ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन पुढील व्याज |
| लवाद अर्ज क्र. ४२/२०२५<br>१) मंगेश नाथराव मुंढे, रा. दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.२३,६७,५५५ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन पुढील व्याज |
| लवाद अर्ज क्र. ४४/२०२५<br>१) मंगेश नाथराव मुंढे, रा. दशमेशनगर, मु. पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.२१,६४,७७६ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन पुढील व्याज |
| लवाद अर्ज क्र. ४३/२०२५<br>दीपक सुधाकर अडाणी, रा. ७८१ -५, कल्याणनगर, पाचोड बु., ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.१५,४०,८६२ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन पुढील व्याज |
| लवाद अर्ज क्र. ४५/२०२५<br>१) गंगाधर नाथराव मुंढे, रा. दशमेशनगर, मु.पो.ता.जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.२५,३९,३८२ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन व्याज |
| लवाद अर्ज क्र. ४६/२०२५<br>दिगंबर गंगाधर डहाळे, रा.स्वराजनगर, सर्वे नं.५१ प्लॉट नं.३४, मु.पो.मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन, ता. जि. छत्रपती संभाजीनगर<br>२अ) स्वाती रमेश उदावंत व २ब) यश रमेश उदावंत, दोघे रा. ७४ जुने पाचोड बु. ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | रु.२७,२८,३३१ + दि.: ०१/०५/२०२५ पासुन पुढील व्याज |

सदर नोटीसीद्वारे तुम्ही वरील सामनेवाला यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचे विरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्जाचे प्राथमिक सुनावणी व चौकशीचे कामे आपण दि.: २०/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता लवाद प्राधिकरण कार्यालय द्वारा नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड तिसरा मजला वैकुंठभाई मेहता प्रशिक्षण सभागृह नगर अर्बन को-ऑप. बँक लि., बँक रोड, पानसरे गल्ली, अहमदनगर ४१४००१ येथे न चुकता हजर राहावे. तुम्ही हजर न राहिल्यास तुमचे विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी - एकतर्फा हुकूम करण्यात येईल व कायद्याप्रमाणे निकाल (अवॉर्ड) करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

श्री अमित जी. चोरडिया
लवाद अधिकारी, अहमदनगर

ARL



**कार्यालय नगरपरिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फॅक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग :- , जा.क्र./न.पा./२०६५/२०२५-२६, दिनांक ३१/१०/२०२४

**जाहीर सुचना**

**या जाहीर सुचनेव्दारे हिंगोली शहरातील नगरपरिषद हद्दीतील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, जनहित याची क्र.७१/२०१३ व Interim Application (Lodgin) No 29109 of 2025 अंतर्गत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रस्त्यावरील खड्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व नगरपरिषद, हिंगोली येथे समिती गठीत करण्यात आली आहे या समिती प्राप्त झालेल्या तक्रारीचा निपटारा व वारसांना नुकसान भरपाई देणे करीता हिंगोली शहरातील नागरीकांना कळविण्यात येत आहे.**

(स्वाक्षरीत)
मुख्याधिकारी
नगर परिषद, हिंगोली



**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९३ /२०२५

१/- हरिभाऊ भागाजी सपकाळ, वय ४८ वर्ष, धंदा शेती, रा. टिटवी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- संतोष भागाजी सपकाळ, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने यारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मथत भागाजी राणोबा सपकाळ गांचा दिनांक २७/०८/२०२९ रोजी मोजे टिटवी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, व जयवंताबाई भागाजी सपकाळ याचा मृत्यू दिनांक २५/०५/२०२१ रोजी टिटवी येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात बरील अर्जदार क्रं. ते २ हे वारस आहे, असा अर्थ मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदारू ब्रां.१ ते २ है मयत भागाजी राणोबा सपकाळ व जयवंताबाई भागाजी सपकाळ यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रवाटनाद्वारे प्रसिद्ध केल्ल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ३/१०/२०२५ रोजो सही व न्यायालयाच्या शिक्क्यासंड दिले असे.

पु.ता. : १९/१२/२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)



**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जाक्र २०२५/संकीर्ण/जमृअ/सीआर-४३३/२०२५/कावि-०३

**जाहीर प्रगटन**

अर्जदारः- श्री./ श्रीमती. रेहान मोईस शेख मारोती मंदिर समोर, बाजारपेठ ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. रेहान मोईस शेख, मारोती मंदिर समोर, बाजारपेठ ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि.२८.०८.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नाये, हस्सात रेहान शेख यांचा दिनांक ०२.०४.२०२० राजा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नदि नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. रेहान मोईस शेख यांचे मुलगा नामे, हस्सान रेहान शेख यांची जन्म नोंद नसल्यान्यासन उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.ते.म.व रू, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुंचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगा नामे, हस्यान रेहान शेख यांचा दिनांक ०२.०४.२०२० रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उनर/आक्षेप/ह करा / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षप / इरकता तक्रार मूळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक साष्ट नमुद करून लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / /२०२५ रोजी देण्यात आले.

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता



**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २१०/२०२५.

अर्जदारः- विकास पितांबर चव्हाण, वयः ३५ वर्षे, धंदा शेती, रा. नांदगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार-निरक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे कै. पितांबर धनसींग बव्हाण के दिनाकः-३०/०३/२०२४ ला मौजे नांदगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असून त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः २६/११/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- ०१/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव



**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९४/२०२५

१/- राजेंद्र रामदास महानोर, वय ३७ वर्ष, धंदा शेती, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- बारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या म्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रामदास राजेंद्र महानोर यांचा दिनांक २९१०/२०१४ रोजी मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, व गयाबाई रामदास महानोर याचा मृत्यू दिनांक ०८/०४/२०२१ रोजी पळसखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं.। है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. हे मयत रामदास राजेंद्र महानोर व गयाबाई रामदास महानोर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या बारस प्रमाणानत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ३१/१०/२०२५ रोजी राही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. - १९/१२/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)



**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्वर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २६१/२०२५

अर्जदारः १) कादर बशीर मेवाती (पठाण), वयः ६५ वर्षे, २) उमरखों बशीरखों पठाण, वयः ६३ वर्षे, ३) खलील खाँ चशीर खॉ पठाण, वयः ४५ वर्षे, ४) गफार बशीर मेवाती (पठाण), वयः ५० वर्षे, ५) सत्तार बशीर खॉ पठाण, वयः ४८ वर्षे, ६) शवनुरवी मस्तानखों पठाण, ययः ५२ वर्षे ७) हजराबी रहेमान मेवाती (पठाण), वयः ५२ वर्षे, ८) इम्रान रहेमान मेवाती (पठाण), वयः ३१ वर्षे, वरील सर्वांचा धंदाः शेती, रा. वेताळवाडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ९) सायराबी जाकीर पठाण, वयः २९ वर्षे, रा. कठोरा बाजार, ता. भोकरदन, जि. जालना.

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक,

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे बशीर खाँ चाँद खों मेवाती (पठाण) हे दिनाकः-१०/०२/२०२४ ला मौजे नांदगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणं आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः २४/११/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- ०१/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव



**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९१/२०२५

१/- भीराबाई एकनाथ महानोर, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. पळासखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- पंढरी एकनाथ महानोर, वय ४० वर्षे, धंदा, शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत,

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा.सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मवत एकनाथ विठोबा महानोर यांचा दिनांक ९९/०५/२०१५ रोजी मौजे पळासखेड़ा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ है वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत एकनाथ विठोबा महानोर यांचे वारस असून त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमागपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे,

पु. ता. १९/१२/२०२५

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालेप सोयगांव.)



**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यार्यालय जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क. २९२/२०२५

अर्जदारः-१. शेती, सागर बालु लाठे, वय-२५ वर्षे, धंदा रा. गलवाडा-अ., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारः-सुनिता बालु लाठे उर्फ सुनिता जितेंद्र साळुंक, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. खुडगांव, ता. भिकनगांव, जि. निमाड, मध्यप्रदेश.

प्रकरण :वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर. ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत बालु बाबुराव लाठे हे दि. २३/०७/२००२ रोजी गलवाडा-अ, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार व गैरअर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत बालु बाबुराव लाठे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख - १९/१२/२०२५-

आज दि. ०१/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमृत तर्फे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

## DGCA मान्यताप्राप्त प्रशिक्षणातून युवकांना नवे करिअर घडविण्याची

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी (अमृत) तर्फे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करून युवकांना रोजगारक्षम बनविणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हे या उपक्रमामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अंतर्गत १० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून उमेदवारांना नागरिक उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) मान्यताप्राप्त प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रशिक्षणानंतर उमेदवारांना अधिकृत दूरसंवेदन पायलट परवाना मिळणार असून, कृषी, सर्वेक्षण, छायाचित्रण, चित्रफित निर्मिती, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, शेतीमध्ये फवारणी व तपासणी अशा विविध क्षेत्रांत रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या दिशा खुल्या होतील.प्रशिक्षणामध्ये मध्यम वर्ग ड्रोन प्रशिक्षण, लघु वर्ग ड्रोन प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण, कृषी क्षेत्रातील ड्रोन वापर, वाहतूक आणि आपत्ती व्यवस्थापनातील ड्रोन वापर, नकाशांकन व सर्वेक्षण, ड्रोन देखभाल आणि सेवा प्रशिक्षण तसेच छायाचित्रण व चलचित्र निर्मिती प्रशिक्षण अशा एकूण आठ प्रकारचे अभ्यासक्रम समाविष्ट आहेत. प्रत्येक तुकडीत १५ विद्यार्थ्यांचा समावेश असेल.

हे प्रशिक्षण पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, रायगड, कोल्हापूर आणि परभणी या केंद्रांवर आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्राथमिक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा समाजांना दिला जाणार आहे, ज्यांना कोणत्याही शासकीय महामंडळ किंवा संस्थेकडून समकक्ष योजना मिळत नाही. यामध्ये ब्राह्मण, मारवाडी, माहेश्वरी, गुजराती, सिंधी, राजपूत, कोमटी, पटेल, बंगाली, ठाकूर, पाटीदार आदी समाजांचा समावेश आहे. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावेत, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे आणि शैक्षणिक पात्रता किमान दहावी उत्तीर्ण असावी.

अर्जदारांनी ओळखपत्र, अधिवास प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र,फिटनेस दाखला तसेच शैक्षणिक पात्रतेचा पुरावा (शाळा सोडल्याचे दाखला किंवा प्रमाणपत्र) सादर करणे आवश्यक आहे.इच्छुक उमेदवारांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जाची छापील प्रत सर्व कागदपत्रांसह स्वाक्षरीसह अमृत संस्थेच्या अथर्व कॉम्प्लेक्स, नवगण कॉलेज रोड, बीड येथील जिल्हा कार्यालयात सादर करावी. पहिल्या तुकडीसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर २०२५ असून, प्रशिक्षण कालावधी १० ते २० नोव्हेंबर २०२५ असा आहे. पहिल्या तुकडीसाठी नोंदणी ५ नोव्हेंबरला पूर्ण होणार असली तरी इच्छुकांनी पुढील तुकडीसाठी आपली नोंदणी करून ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या संदर्भात अमृत संस्थेचे बीड जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी (मो. ९४२११७३२५१), जिल्हा उपव्यवस्थापक दिगंबर भाऊदेव जोशी (मो. ९८९०५५९२६१) तसेच अमृत मित्र सुमित धिरडे आणि चिंतेश जोशी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चौसाळा येथे रस्ता रोको आंदोलन

## डॉ.संपदा मुंडे यांच्या मृत्यू प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

डॉ. संपदा मुंडे यांच्या मृत्यूला जबाबदार आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी चौसाळा (ता. बीड) येथे आज (१ नोव्हेंबर) सकाळी मोठ्या संख्येने नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान आरोपीस फाशी द्या, डॉ. संपदा मुंडे यांना न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणा देण्यात आल्या.

या प्रसंगी सचिन आंधळे, तुळशीराम तांदळे, पांडुरंग तांदळे, रमेश तांदळे, संतोष तांदळे, उमेश आंधळे, प्रशांत मुंडे, बाळासाहेब मोरे, अंकुश कळाशे सतीश जोगदंड, श्रीमंत सोनवणे, अक्षय लोढा, पंजाब वाघमारे, सुधाकर गुंजाळ, मोहन झोडगे, पवन कुचेकर, अंकुश गोरे बबलू शिंदे, ज्ञानेश्वर आंधळे, धीरज आंधळे, कल्याण खाडे, वामन मुंडे, पांडुरंग आंधळे आदींसह चौसाळा सर्कलमधील मोठ्या प्रमाणात जनसमुदाय सहभागी झाला होता.

> डॉ. संपदा मुंडे यांचा मृत्यू हा एक साधा प्रकार नाही, तर महिलांच्या सुरक्षेवरचा प्रश्न आहे. ही आत्महत्या नसून संस्थात्मक खून आहे. संपदा मुंडे यांनी मृत्यूपूर्वी केलेल्या लेखी तक्रारींकडे रूग्णालय प्रशासन आणि पोलिसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, म्हणूनच ही दुर्दैवी घटना घडली. आरोपीस कठोरात कठोर शिक्षा मिळेपर्यंत आम्ही लढा सुरू ठेवणार आहोत.
> –सचिन आंधळे

आंदोलनानंतर बीड तहसीलदारांच्या वतीने उपस्थित प्रतिनिधी जायभाय यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात आरोपीस कठोर शिक्षा देऊन मृत्युदंडाची मागणी करण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाने शिस्तबद्ध पद्धतीने आंदोलन पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

# रिपब्लिकन पत्रकार संघ महाराष्ट्र राज्यच्या वतीने रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचा भव्य नागरी सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल एज्युकेशन सोसायटी या संस्थेला महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करून पाचशे कोटी रुपयांचा निधी प्राप्त करून दिल्याबद्दल दिनांक १ नोव्हेंबर २०२५ रोजी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब यांचे छत्रपती संभाजीनगरमध्ये तापडिया नाट्यगृह येथे भव्य नागरी सत्कार करण्याचे आयोजन रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमात त्यांचा सत्कार रिपब्लिकन पत्रकार संघ महाराष्ट्र राज्यच्या वतीने संस्थापक अध्यक्ष पँथर माणिकराव वाघमारे, सतीश कापसे, बाबासाहेब मनेरे, रवीकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.सुशील सूर्यवंशी, महाराष्ट्राचे नेते सुनीलराव वाकेकर, राज्य सचिव विनोदराव काळे, बोधनकर, मराठवाडा नेते सचिन निकम, राज्य कार्यकारणी सदस्य चंद्रकांत रुपेकर, मराठवाडा सहसचिव सिद्धांत मोरे, संभाजी नगर जिल्हाध्यक्ष पूर्व मिलिंदराव मोकळे, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पश्चिम काकासाहेब गायकवाड, संभाजीनगर शहराध्यक्ष नितीन वाकेकर,संभाजीनगर शहराध्यक्ष (मध्य)राहुल गवळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्ह्याच्या भूमीपुत्रांचे दैदीप्यमान यश

## ना.पंकजाताई मुंडेंनी केले सर्वांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या जिल्ह्यातील भूमिपुत्रांचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे. जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे अशा शब्दांत त्यांनी यशस्वीतांचे कौतुक केले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र शैलेश भिकाराम आंधळे (Rank 04), प्रकाशकुमार महादेव बडे (Rank14), राहुल शिवाजी तांबे (Rank 26), लक्ष्मण दिनकर गुट्टे (Rank 56), अजितसिंह मधुकर शिंदे (Rank 58), रामदास नामदेव चोले (rank90), तेजस भीमाशंकर होनराव (rank98), नितीन भोलाजी खेंगरे (Rank 139), श्रीकांत दत्तात्रय होरमाळे (Rank140). या सर्वांनी दैदिप्यमान यश संपादित करत घवघवीत यश मिळवले आहे.

राज्यपातळीवर आपल्या जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पुढील काळात राज्यातील सर्वसामान्य नागरीकांची सेवा तुमच्या हातून घडणार आहे. सामान्यांच्या समस्या आणि सेवेला प्राथमिकता देऊन आपण राष्ट्रनिर्मितीत भरीव योगदान द्याल हा विश्वास आहे. तुम्हा सर्वांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा अशा शब्दांत ना.पंकजाताईंनी कौतुक केले आहे.





बीड शहरातील इस्लामपुरा भागातील शेख रशीद शेख अजीज (आतार) यांचा राहत्या घरावर शॉर्टसर्किटमुळे घराला आग लागून मोठे नुकसान झाले. जावेद भैय्या कुरेशी यांनी भेट देऊन आधार देत आर्थिक मदत केली. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# प्रा.डॉ.सिद्धार्थ मस्के यांचा गुजरात उच्च शिक्षण विभागाकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

केसापुरी वसाहत येथील प्रा.डॉ.सिफ्द्धार्थ श्रीहरी मस्के (SCOPE) सोसायटी फॉर क्रियेशन अपोर्च्युनिटी थ्रू प्रोफीशीयंसी इन इंग्लिश प्रकल्प उच्च शिक्षण विभाग गुजरात आणि केंब्रिज विद्यापीठ,यू.के.यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत दक्षिण गुजरात विभागातून गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,अहवा जि. डांग यास पहिली रँक प्राप्त झाल्याबद्दल या विशेष कामगिरीसाठी उच्च शिक्षण विभाग,गुजरात द्वारा गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.यु.के.गांगुर्डे व आहवाचे स्कोप समन्वयक डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के यांना प्रमाणपत्र तसेच कॉलेजला मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला.तसेच उत्तीर्ण विदयार्थ्यांना केंब्रिज विद्यापीठचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आला असून त्यांना सौ.वृंदावणी श्रीहरी मस्के, डॉ.सविता सिद्धार्थ मस्के,पदमीन सिताराम मस्के,संध्या विजय मस्के,सुनील मस्के,अनिल मस्के,कलावती श्रीकांत मस्के,प्रा.शिवदास घाडगे,उत्तमराव वाघमारे,प्रा. प्रसेंजित मस्के,भागवत सिरसट,ऍड.रविकांत उघडे यांच्यासह सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# शासकीय कापूस खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ

## माजलगाव बाजार समितीच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ नोव्हेंबर**

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वतीने शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्रीसाठी नोंदणीची मुदत दि. ३१ ऑक्टोबर पर्यंतच होती. परंतु माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच. एन. सवणे यांनी सिसीआयशी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दखल घेत सिसीआयने दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणीची मुदतवाढ दिली असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

हवामानातील अनिश्चितता, हंगामाच्या शेवटपर्यंत झालेला पाऊस आणि शेतकऱ्यांची कापूस वेचणी सुरू न झाल्याने मोठ्या संख्येने शेतकरी नोंदणीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. या पार्श्वभूमीवर माजलगाव बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उउख तसेच कृषी खात्याकडे वेळो-वेळी पत्रव्यवहार करून मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. याची दाखल कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सिसीआय) ने घेत शासकीय कापूस खरेदी नोंदणीची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ वरून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या निर्णयामुळे माजलगाव तालुक्यातील तसेच अनेक भागातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, कापूस हमीभावाने विक्रीसाठी अधिक शेतकरी नोंदणी करू शकतील. ३१ डिसेंबर पर्यंत झालेल्या मुदतवाढीत शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त नोंदी करून घ्याव्यात व नोंदी पासून कोणीही शेतकरी बांधवांनी वंचित राहू नये असे आवाहन उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगावचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव एच.एन.सवने यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

# एक धागा सुताचा

दिनेश गुणे

दैनंदिन जीवनशैलीत ज्या काही बाबी आपल्याला जिव्हाळ्याच्या वाटतात, त्यामध्ये राजकारण हा एक आवडता विषय असतो. अनेक जण राजकारणाकडे गांभीर्याने पाहात असल्याने, देशाच्या राजकारणात जे काही घडत, बिघडत असते, त्यानुसार त्यांच्या आनंदाचा निर्देशांक बदलत असतो. अनेकदा असे काही घडते की त्यामुळे त्यांना काहीतरी आशादायक वाटू लागते आणि असेही काही वेळा घडते, त्यामुळे नैराश्य वाटू लागते. कधी कधी राजकारणाविषयी चिंता वाटू लागते आणि कधी कधी किळसही येते. अलिकडच्या काळात तर चिंता वाटण्यासारख्याच घटना अधिक असाव्यात अशी स्थिती असल्याने, राजकारणाकडे गांभीर्याने पाहावयाचे की जे काही चालले आहे त्याकडे करमणुकीच्या भावनेने पाहावयाचे याचा संभ्रम वाटण्यासारखी स्थिती आहे. गेल्या काही महिन्यांत तर, राजकारण ही केवळ करमणूकच नव्हे, तर तो निव्वळ विनोद असावा असेही काही घडताना दिसू लागले आहे. दिवाळीच्या दिवसांत फटाक्यांची आतषबाजी करण्यातली मजा अनुभवणे हा मुलांच्या आनंदाचा सोहळा असतो. यंदाच्या दिवाळीत मात्र, पावसाळी वातावरणामुळे काही फटाके वाजलेच नाहीत. आपला फटाका हमखास वाजणार या विश्वासाने काही जण तो घेऊन मैदानात उतरले, त्याची वातही पेटविली आणि आता मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने लोकांच्या नजराही त्या फटाक्याकडे लागल्या. फटाका वाजविणाऱ्यानेही आपले कान झाकून घेतले आणि होणाऱ्या हादऱ्याने बरीच काही पडझड वगैरे होणार या अपेक्षेने वाटही पाहिली. पण त्यांना आणि लोकांनाही अपेक्षित धमाका झालाच नाही आणि फटाक्याची पेटविलेली वात आतल्या दारूपर्यंत पोहोचण्याआधीच विझून गेल्याने त्यांचाच हिरमोड झाला. आता दिवाळी संपल्यानंतर असे, न वाजलेले फटाके गोळा करून त्यांना दुसऱ्या फटाक्यांच्या वाती लावून पुन्हा वाजविण्याचा प्रयत्नही काही जणांनी सुरू केला आहे. कुणा एखाद्याने अगोदर वाजवलेला फटाका फुसका निघाल्यानंतर त्याला दुसऱ्या फुसक्या फटाक्याची वात लावून तो पुन्हा वाजविण्याचे तंत्र जमले की होणारा आनंद मूळ वातीच्या फटाक्यातून निघणाऱ्या आवाजाहूनही अधिक असतो. तो आनंद मिळविण्याचा प्रयत्न त्यामध्ये होता, हे उघड आहे. पण तो प्रयत्नदेखील फसल्यावर होणारा हिरमोड मात्र निराशाजनक असतो.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना, काही आठवड्यांपूर्वी काहीसा तोच अनुभव आला असावा. अ‍ॅटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात मोठा गाजावाजा करून त्यांनी उभ्या पक्षाला कामाला लावून एक अ‍ॅटम बॉम्ब तयार केला आणि मोठ्या उत्साहात माध्यमांच्या साक्षीने त्यांनी या अ‍ॅटम बॉम्बची वातदेखील पेटविली. या फटाक्याचा मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने त्यांनी स्वत:चेच कान घट्ट झाकूनही घेतले, पण तो फटाकाही वाजलाच नाही. मोठ्या अपक्षेने फटाक्याची वात पेटवावी, हाताने कान घट्ट झाकून घ्यावे आणि वात विझून गेल्याने आवाजही येऊच नये, असे झाल्यावर लहान मुलांना जे वाटते, तसेच काहीसे त्यांनाही झाले असावे. राहुल गांधी यांच्या त्या अ‍ॅटम बॉम्बचा स्फोट तर झाला नाहीच, पण तो साधा वाजलादेखील नाही. उलट, राहुल गांधी ज्या आवेशात आरोपांच्या माळा लावतात, तो आवेशच नंतर फुसका ठरतो हे पुन्हा एकदा दिसू लागल्याने त्यांचा हा नवा बॉम्बदेखील अगोदरच्या अनेक फुसक्या फटाक्यांप्रमाणेच निकामी ठरल्याचीच चर्चा सुरू झाली. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला मतचोरीचा फटका बसला होता, असा एक कांगावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनीही एकदा केला होता, तेव्हाही काँग्रेसजनांना तो मोठा अ‍ॅटम बॉम्ब वाटला होता. पण निवडणूक आयोगाने काँग्रेसला चर्चेसाठी पाचारण केल्यावर मात्र, या बैठकीत हजर राहण्याचे टाळून आपला बॉम्ब फुसका निघाल्याची अप्रत्यक्ष कबुलीच काँग्रेसने दिली होती. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मतचोरीचे काही दाखले दिल्यानंतर हेच आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल करण्याचे आयोगाने दिलेले आव्हानही काँग्रेसने स्वीकारलेच नाही आणि नेहमीप्रमाणे हा नवा फटाकादेखील फुसका होता हे स्पष्ट झाले.

अ‍ॅटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात राहुल गांधींना मैदानात उतरवायचे आणि ऐनवेळी तो बॉम्बच फुसका निघावा हा राहुल गांधींच्या बाबतीत काँग्रेसला येणारा हा काही पहिलाच अनुभव नाही. याआधीही राहुल गांधींचे अनेक फटाके असेच फुसके ठरले होते. त्यामुळे असे फुसके फटाके वाजविण्याऐवजी नव्या करमणुकीच्या खेळांचा सराव सुरू झालेला दिसतो. राहुल गांधी हेच या नव्या खेळांचे कप्तान आहेत. सध्या त्यांनी पंतप्रधान मोदी यांना घेरण्यासाठी लावलेल्या नव्या फटाक्याची वात काँग्रेसच्याच दिशेने फिरल्याचे दिसू लागले आहे. मोदी मतांसाठी काहीही करून दाखवतील, त्यांना नाच करावयास लावले तर ते नाचदेखील करतील असे काहीसे विचित्र विधान त्यांनी एका सभेत जाहीरपणे केल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर फिरू लागली आणि मतदारांच्या हातात हात गुंफून नाच करणाऱ्या सोनिया गांधी, प्रियांका गांधी आणि खुद्द राहुल गांधी यांच्याच चित्रफितींचा सुळसुळाट समाजमाध्यमांवर दिसू लागला. मतांसाठी नाच करण्याची गांधी कुटुंबाचीच परंपरा अधोरेखित करून राहुल गांधींचा नवा फटाकादेखील फुसका ठरविण्याकरिता समाजमाध्यमांवरील एक सजग वर्ग सज्ज झालेला दिसत आहे.

तरीही, अशा प्रकारे राहुल गांधी यांनी पेटविलेले फटाके फुसके निघाल्यानंतर न वाजलेल्या त्याच फटाक्यांना नव्या वाती लावून नवे स्फोट घडविण्याची नवीच कल्पना उद्धव ठाकरे यांच्या गटास सुचली आणि हुबेहूब राहुल गांधी यांनी केलेल्या तयारीचीच नक्कल करून आदित्य ठाकरे यांनी मतदारयाद्यांच्या घोळाचे प्रात्यक्षिक करून राहुल गांधींना जे



जमले नाही ते करून दाखविण्याचा प्रयत्न केला. मागच्या आठवडाभरात अशाच 'कॉपी पेस्ट' उपक्रमांना महाराष्ट्राच्या राजकारणात उधाण आले होते. आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या वरळी विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांमधील घोळाचे काही नमुने कार्यकर्त्यांसमोर सादर केले आणि पुन्हा एकदा निवडणूक आयोगाविषयी संभ्रम पसरविण्याच्या राहुल गांधी यांच्याच प्रयत्नांची पुनरावृत्ती करून पाहिली. पण त्या फटाक्याचाही फारसा गाजावाजा झालाच नाही. राहुल गांधींच्या फुसक्या फटाक्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आव्हान तरी दिले होते. आदित्य ठाकरे यांनी तोच न वाजलेला फटाका नव्या वातीनिशी पुन्हा वाजविण्याचा प्रयत्न केल्यानंतर निवडणूक आयोगाने तर त्याची दखलही घेतलेली दिसत नाही. या फटाक्याचा स्फोट घडविण्यासाठी आदित्य ठाकरे यांनीदेखील राहुल गांधी यांच्यासारखाच मंच सजवला होता. त्याच पद्धतीचे सादरीकरण करून काकणभर सरस नेपथ्य घडविण्याचा प्रयत्नही केला गेला. पण मतदारयाद्यांतील काही त्रुटींमुळे किंवा यादीतील घोळामुळे मतदानात घोळ असल्याचा छातीठोक दावा मात्र कोणालाच करता आला नाही. एखाद्या मतदाराचे नाव वेगवेगळ्या याद्यांमध्ये असू शकते, त्याची काही कारणेही असतात. नावांची अशी पुनरावृत्ती होणे योग्य नाही, याबाबत कोणाचेही दुमत नसूनही, दोन वेगवेगळ्या याद्यांमध्ये नाव असलेला मतदार दोन वेळा मतदान करू शकत नाही, ही बाब मात्र गुलदस्त्यात ठेवून मतदारांमध्ये संभ्रम पसरविणारा तो फटाकाही फुसकाच ठरला. मागे एकदा, नवी मुंबईतील एका सभेत खुद्द शरद पवार यांनीच मतदारांना एक सल्ला दिला होता. आपल्या गावी असलेल्या यादीत तुमचे नाव असेल तर गावाकडे मतदान करा, नंतर बोटावरची शाई पुसा आणि पुन्हा मुंबईत मतदान करा, असे त्यांनी भर सभेत सांगितल्यामुळे गोंधळ उडाला. आम आदमी पार्टीने तर, याआधीच्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाल्याचा थेट आरोपही केला. या वक्तव्याच्या चौकशीची चक्रे फिरू लागली तेव्हा पवार यांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली. असे दुबार मतदान कसे करता येईल असा प्रश्नही विचारला गेला आणि आपण गमतीने तसे बोललो असे सांगून पवार यांनीच दुबार मतदानाच्या शक्यतेचा इन्कारही केला होता. आज पवारांनी मतदारांना दिलेला तो सल्ला आणि नंतर केलेली ती सारवासारव लक्षात असती तर कोणीही दुबार मतदानाचा कांगावा करत भुई धोपटली नसती.

आदित्य ठाकरे यांचा प्रयोगही राहुल गांधी यांच्या प्रयोगाप्रमाणेच फसला. असा कांगावा लोकांना पटत नाही हे स्पष्ट झाल्यावर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी आता याच मुद्यावर दंड थोपटले आहेत. मनसेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांना एका गहन प्रश्नाने ग्रासलेले आहे. तोच प्रश्न खुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनाही पडला होता आणि त्याचे उत्तर त्यांना कधीच सापडलेही नव्हते. आपल्या सभांना एवढी प्रचंड गर्दी होते, मग मतदानाच्या वेळी हे लोक कोठे जातात, असा प्रश्न त्यांनी सभेला उपस्थित असलेल्या जनतेलाच विचारला होता. तेव्हा तर, राज्यात काँग्रेसच्या झेंड्याखाली सत्ताकारण सुरू होते. बाळासाहेबांना ते कोडे कधीच उलगडले नाहीच, पण त्याच कोड्याचे ओझे पुढे राज ठाकरे यांच्या खांद्यावर येऊन पडले. राज ठाकरे यांच्या सभांनाही प्रचंड गर्दी होते. त्यांच्या भाषणाला टाळ्या, शिट्ट्यांचा गजरही होतो. पण त्यांनाही मते मात्र मिळतच नाहीत. मनसेच्या स्थापनेपासून पुढे या पक्षाला मतांच्या राजकारणात गळतीच लागली आणि त्यांच्यासमोरील हे कोडे अधिकच गूढ होत गेले. अजूनही त्यांना तो प्रश्न पडलेला असल्याने, मतदारयाद्यांच्या घोळाचा धागा पकडून त्याचे उत्तर शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. वस्तुत:, राज ठाकरे किंवा उद्धव ठाकरे यांनी मतदारांच्या मानसिकतेचा किंवा मतदारांच्या अपेक्षांचा फारसा विचार केलेला नसावा, असा त्यांच्या एकूण राजकारणाचा बाज आहे. आपण ठरवू ते धोरण आणि आपण बांधू ते तोरण अशीच त्यांची राजनीती आहे. त्यामुळेच, सत्ता हाती द्या, मी सगळे सुतासारखे सरळ करेन असा दावा करणारे राज ठाकरे सतत तोडफोडीची आणि खळ्ळ खट्याकचीच भाषा करत राहिले. मारझोड, नासधूस, ही त्यांच्या राजकारणाची दिशा अनेकदा स्पष्ट झाली आहे. कोणताही जनहिताचा प्रश्न हाती घेऊन तोदेखील नासधूस, तोडफोडीच्या मार्गाने सोडवावा या विचारावर राज ठाकरेंचा पक्ष ठाम असतो, असे अनेकदा दिसून आले आहे. रस्त्यांवरील टोल आकारणी हा जनतेच्या दृष्टीने संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तो राजकीय चातुर्याने हाताळला, तर जनतेचा विश्वास संपादन करणे शक्य होते. पण हा प्रश्नदेखील राज ठाकरे यांच्या पक्षाने खळ्ळ खट्याक नीतीनेच हाताळला आणि या मुद्यावरून लावलेला फटाकाही फुसकाच ठरला. सभेसाठी जमणाऱ्या अलोट गर्दीचे रूपांतर मतदानात का होत नाही, हा बाळासाहेबांना पडलेला प्रश्न राज ठाकरेंना पडला, ते साहजिकही होते. उद्धव ठाकरे यांना मात्र तो प्रश्न पडण्याचे फारसे काही कारणच नसावे. कारण त्यांनी युती आणि आघाडीच्या आधारावरच सत्ताकारण केले. शिवसेनेत फूट पडण्याआधी उद्धव ठाकरे यांनी आपल्या राजकारणाची दिशा बाळासाहेबांच्या राजनीतीच्या नेमक्या उलट दिशेने फिरवली. भाजपसोबतच्या दीर्घकाळातील युतीमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला सत्तेच्या सान्निध्यात राहणे शक्य झाले होते. पुढे भाजपविरोधात कडवट भूमिका घेऊन त्यांनी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी केली, त्यामुळे पुन्हा सत्तेची ऊब मिळतच गेल्याने, मतांच्या बेरजेचा हिशेबही करण्याची गरज त्यांना भासली नसावी. शिवसेनेच्या सभांना होणाऱ्या गर्दीत त्या पक्षाच्या मतदारांचा आकडा घरंगळत चालल्याचे स्पष्ट होऊनही, सत्ता सहजसाध्य होत गेल्याने, उद्धव ठाकरे यांना तो प्रश्न पडला नसावा. आता मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर पक्षाला पुरती गळती लागल्यावर कदाचित त्यांना सत्तेची नवी गणिते, नव्या कुबड्या शोधण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या प्रश्नाची पालखी त्यांच्याही खांद्यावर येण्याची चिन्हे दिसू लागल्याने, पुन्हा त्यांच्या गटानेही मतदारयाद्यांच्या घोळाच्या सुतावरून राजकारणातला स्वर्ग गाठण्याचा राहुल गांधी यांचा फुसका फटाका वाजविण्याचा खटाटोप चालविलेला दिसतो.

त्यामुळेच, राजकारणाकडे गांभीर्याने पाहणाऱ्यांना आता त्यात फारसा रस राहिलेला नाही. राजकारण हा करमणुकीचा खेळ वाटावा असे अनेक नवनवे किस्से यात भर टाकत आहेत. सरत्या आठवड्याच्या सुरुवातीस, गेल्या सोमवारी उद्धव ठाकरे यांच्या गटाचा निर्धार मेळावा मुंबईच्या वरळी डोममध्ये पार पडला. याच मेळाव्यात आदित्य ठाकरे यांनी मतदारयादीतील गोंधळाच्या राहुल गांधी यांच्या प्रात्यक्षिकाचा पुढचा प्रयोग सादर केला होता आणि त्यापाठोपाठ राज ठाकरे यांनी आपल्या पक्षाच्या मेळाव्यात मतदान यंत्रे घोळ करू शकतात असे लोकांना भासविण्यासाठी काही जादूचे प्रयोगही करून दाखविले होते. सार्वजनिक मंचावर सनसनाटी आरोप करून सरकारविरुद्ध आणि सरकारी यंत्रणांविरुद्ध समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याची एक सूत्रबद्ध कार्यपद्धती कामाला लागलेली आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या त्या फसलेल्या प्रयोगानंतर केला होता. अशा प्रयोगांमुळे आरोप करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेभोवतीच गैरसमज आणि संशयाचे धुके पसरणार असून ते टाळावयाचे असेल तर सज्जड पुराव्यांसह जनतेसमोर जाणे योग्य ठरते, असा सल्लाही त्यांनी त्या वेळी दिला होता. आदित्य ठाकरे यांनी राहुल गांधी यांच्या प्रयोगाचीच नक्कल केल्यानंतर फडणवीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. महाराष्ट्रात दुसरा पप्पू तयार होऊ नये, असा टोला त्यांनी हाणला होता. सरकार आणि स्वायत्त संस्थांच्या विरोधातील आरोपांची शहानिशा करण्याची एक विहित कार्यपद्धती असते. संविधानाने त्या कार्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संविधानाची हमी देत या कार्यपद्धतीस नाकारून कोणी नेता बेछूट वक्तव्ये करत असेल, तर त्यातील गांभीर्य नाहीसे होईल, म्हणून, केवळ सुताचा एक धागा पकडून स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न म्हणजे राजकारणातील करमणुकीचा प्रयोग ठरतो. तसे होऊ नये यासाठी नेत्यांनी काळजी घ्यायला हवी. ▮▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### अनुभूती व अनुभव देणारी गिरनार यात्रा

या वर्षीची गिरनार परिक्रमा १ नोहेंबर ते ५ नोहेंबर कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमापर्यंत होणार आहे. या परिक्रमेची आख्यायिका अशी आहे. गिरनार हा हिमालय पुत्र व माता पार्वतीचा भाऊ. माता पार्वती आणि शिव यांचा विवाह सोहळा २०००० वर्षांपूर्वी हिमालयात झाला. बहिणीच्या लग्नासाठी गिरनार समुद्रातून बाहेर पडला आणि जमिनीवर स्थिर झाला समुद्रापासून अवघ्या ५० किमी. वर, हिमालयात जाऊ शकला नाही. पुढच्या त्रिपुरारी पौर्णिमेला माता पार्वती भगवान शिवासह गिरनारला मुक्कामी आल्या. शिव पार्वती विवाहात सर्व देव, ऋषी, तीर्थ, नवग्रह अष्ट सिद्धी, नावनिधी, ५२ वीर, ६४ मातृका, ११ जलदेवता, नव नाग, अष्ट वसू, कुबेर भंडारी आले होते. त्यांच्यासह शिव पार्वती ४ दिवस गिरनारवर होते. त्या काळात सर्व देवतांनी गिरनारच्या जंगलात मुक्काम केला होता. आजही कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या दिवसात सर्व देवता गिरनारच्या परिक्रमा मार्गात मुक्कामी असतात. परिक्रमेत पाच रात्री मुक्काम करावा. कमीतकमी एक रात्र तरी मुक्काम करावा म्हणजे या देवतांचे सान्निध्य व आशीर्वाद मिळतात. याकरिता ही परिक्रमा केली जाते. शास्त्रानुसार एकूण ३ गिरनार परिक्रमा केल्या की एका कैलास यात्रेचे पुण्य मिळते. गिरनार पर्वत उजव्या हाताला ठेवून त्याला प्रदक्षिणा घालणे यालाच परिक्रमा करणे असे म्हणतात. गिरनारच्या भोवती पूर्ण जंगल आहे. जे सध्या वनविभागाच्या अखत्यारीत आहे. वर्षभर आपल्याला या जंगलात प्रवेश मिळत नाही. फक्त या परिक्रमेच्या कालावधीत ५ दिवस सर्वांसाठी प्रवेश मिळतो. या जंगलात मुंगी, विंचूपासून ते सिंहापर्यंत भरपूर प्राणी आहेत. पण या ५ दिवसांत हे प्राणी आपल्याला काहीही त्रास देत नाहीत. ही दत्तगुरूंचीच कृपा आहे. देव आणि त्यांचे गण हे सुद्धा या कालावधीत परिक्रमेसाठी येतात आणि परिक्रमा करतात अशी आख्यायिका आहे. ही परिक्रमा करण्याने आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या अनेक पापांची मुक्ती मिळते. त्यामुळे प्रचंड संख्येने भक्त मंडळी ही परिक्रमा करतात. आपल्यासारख्या सामान्य माणसांपासून ते साधू, संत आणि देव सुद्धा ही परिक्रमा करतात. त्यामुळे परिक्रमा करताना या सत्पुरुषांचे दर्शन, आशीर्वाद मिळाल्यास सोने पे सुहागा असतो. गिरनार परिक्रमेचा मार्ग हा पूर्णपणे जंगलातून जातो. तीन डोंगर चढणे आणि उतरणे त्यात तीव्र चढ आणि अतीतीव्र उतार असे स्वरूप आहे.

परिक्रमेला सुरुवात झाल्यावर १२ किलोमीटरवर जिनाबाबा की मढी हे स्थान येते. मागील शतकात गिरनार येथे जिनाबाबा नावाचे अवलिया होऊन गेले. त्यांची एक चिलीम अद्याप येथे आहे. त्या चिलमीतून ते आत-बाहेर करत होते असे म्हणतात. यांची समाधी व धुनी येथे आहे. येथे परिक्रमावासींसाठी गरम भोजन या संस्थानतर्फे उपलब्ध असते. थोडे पुढे सरनो नावाची छोटी नदी लागते. त्यात बरेच जण स्नान करतात. तेथून पुढे ८ किलोमीटरवर मालवेला हे स्थान आहे. मालवेला येथे आंब्याची अनेक झाडे आहेत. तेथून पुढे ८ किलोमीटरवर बोरदेवीचे स्थान आहे. विग्रह आणि मंदिर दोन्ही नितांत सुंदर आहेत. परिक्रमेतील शेवटचा टप्पा हा बोरदेवी ते तलेटी हा मार्ग परिक्रमावासींसाठी अतिशय सरळ आहे.त लेटी म्हणजे गिरनार पर्वताच्या पहिल्या पायरीजवळ आल्यावर ही परिक्रमा पूर्ण होते.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

●● ●●

### जीवनाची समृद्धता : कार्तिक एकादशी

शेकडो वर्षे पंढरपूरच्या विठुमाउलीच्या महाद्वारामध्ये लाखो भक्त अलौकिक सुखाचा अनुभव घेत आले आहेत. महाराष्ट्राच्या मातीमध्ये जन्माला आलेल्या संतांच्या विभूतीने भागवतधर्माचा जो काही आनंदकल्लोळ केला त्यातून समाधानाच्या आनंदाचे निदान सापडले. आणि ते आजही तसेच टिकून आहे. ज्या जागेपणी हा सुखाचा सोहळा अनुभवायचा असतो, तीच आजची प्रबोधन एकादशी आहे. आषाढातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात आणि कार्तिकातल्या प्रबोधिनी एकादशीला ते जागे होतात, अशी विठलभक्तांची श्रद्धा आहे. परंतु ज्या काळात देव झोपतात, त्याच काळात भक्तांनी जागे राहायचे असते. कदाचित म्हणूनच आषाढी ते कार्तिकी चातुर्मासामध्ये अनेक विठ्ठलभक्तांचा पंढरीमध्ये निवास असतो. महाराष्ट्रातल्या अनेक गावागावांमध्ये आश्विन ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत काकडा आरतीचा परिपाठ पाहायला मिळतो. देवाचे झोपणे किंवा जागे होणे हा भक्तांच्या परमेश्वरावरील प्रेमाचा उत्तुंग असा कल्पना विलास म्हणावा लागेल. कारण कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी हा शब्द वापरून भक्तांनी स्वतमच्याच प्रबोधनाचा वसा मात्र कायम ठेवलेला दिसून येतो. आषाढीची महिनाभराची वारी त्यानंतर आपापल्या घरी आलेले वारकरी प्रपंचामध्ये रममाण होत असले तरी विठ्ठलाच्या साक्षीने जागवलेला हा परमार्थ तसाच पुढे चालू ठेवायचा आहे. ही जाणीव त्यांच्या मनामध्ये असते. त्याचे आपल्याला विस्मरण होऊ नये या एकाच श्रद्धेपोटी हा भगवद्भक्त पुन्हा पुन्हा त्या पंढरीच्या महाद्वारावर जाऊन आपल्या भगवद्भक्तीच्या अधिष्ठानाचे आवर्तन करीत असतो. कोणी काहीही म्हणो. परंतु महाराष्ट्राला मिळालेली ही भागवत धर्माची देणगी विलक्षण आहे. ज्ञानेश्वर माउली, जगद्गुरू तुकाराम महाराज, नामदेव महाराज, जनाबाई, मुक्ताबाई अशी ही संत विभूतींची मांदियाळी म्हणजे भगवंताने महाराष्ट्राला प्रेमाने भक्तीचा अलंकारच दान दिल्यासारखे म्हणता येईल. आजच्या प्रबोधिनी किंवा कार्तिकी एकादशीचासुद्धा याच दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातल्या संतांनी आपल्या या अनुभवातूनच समाजाला समृद्ध करणारे अभंग लिहिले.



**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

### अमेरिकेचे आकर्षण कमी करावे

पूर्वीपासूनच आम्हा भारतीयांना अमेरिकेचे जबरदस्त आकर्षण आहे. अमेरिका शस्त्र-शक्ती-धन-तंत्रज्ञानसंपन्न राष्ट्र आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात, संशोधनाच्या क्षेत्रातही तो देश आघाडीवर आहे. लहान देशांना एकमेकाशी भांडण्यात गुंतवून स्वत:चा प्रभाव वाढवण्याचा विचित्र डाव अमेरिका सातत्याने खेळत आहे. जगावर सत्ता गाजवण्याची, बलशाली असल्याने, अमेरिकाला अनुकूल परिस्थिती मिळत राहिली. त्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा अमेरिकेने घेतला आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही त्याच देशाचे वर्चस्व आहे. सगळे जागतिक प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाच्या मार्फतच सोडविले जातात आणि त्यात अमेरिकेच्या मताला जास्त महत्त्व असते. कमी लोकसंख्या असल्याने तो देश धनाढ्य आहे. त्यामुळे तो भौतिकवादी देश आहे. तिथे पैशाला खूप जास्त मान आहे, माणसाला नाही. भावनिक नाते त्या वातावरणात टिकून राहूच शकत नाही. भारत आर्थिकदृष्ट्या गरीब होता पण आता भारताने नवीन आर्थिक धोरण राबवून देशाला आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आणले आहे. देशाचे सैन्यबळ वाढले आहे. नवीन-नवीन संकल्पना राबवून देश प्रगत राष्ट्र होण्याच्या मार्गावर आहे. भारताची परराष्ट्रधोरणे मैत्री वाढवणारी असल्याने अनेक देशांशी भारताचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले आहेत.

भारताने कोरोना काळात जगाला केलेली औषधांची मदत वाखाणली गेली. भारताची ही सगळी आगेकूच, ही दमदार कामगिरी अमेरिकेच्या सत्ताधाऱ्यांना सहन होत नाहीये. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताच्या दौऱ्यावर येऊन गेले आहेत. पंतप्रधान मोदींनी त्यांचे हार्दिक स्वागत केलेले आहे. दोघांनी मैत्रीसंबंध जाहीर केले आहेत, असे असूनही अमेरिकेने विदेशी विद्यार्थ्यांना-भारतीय विद्यार्थ्यांना त्या देशात राहण्याची परवानगी नाकारली, त्यांना भारतात परत पाठविले तेही अत्यंत अपमानास्पद पद्धतीने. देशावर आर्थिक दबाव आणण्यासाठी अनावश्यक आयातकर जाहीर केले, भारताने रशियाकडून तेल घेऊ नये यासाठी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. ऑपरेशन सिंदूर हे अभियान अमेरिकेच्या मध्यस्थीमुळेच थांबवावे लागले असे जाणकारांचे मत आहे. आता अमेरिका पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करतो आहे हे वाचण्यात आले.

अमेरिकेच्या अशा वागण्याचा तरुणांनी विचार करावा. जो देश आपल्याला चुकीची वागणूक देतो, आपल्या शत्रूला मदत करतो, आपल्या प्रगतीत अडसर निर्माण करतो त्या देशात जाणे म्हणजे आपला देशाभिमान, स्वाभिमान विसरण्यासारखे आहे. आपल्या घरात जसे आपण राजे असतो, तसे आपल्या देशात आपण स्वतंत्र, सुरक्षित व निर्भय असतो. म्हणून तरुणांनी अमेरिकेचे आकर्षण कमी करावे. आपला देश जास्त चांगला आहे हे नीट लक्षात घ्यावे. ▮▮

**आशा पांडे**/नागपूर

## मुंबई वार्तापत्र

# सत्याचा नव्हे, सत्तेचा मोर्चा!

नागेश दाचेवार

सत्ता गेल्यानं विरोधक चवताळलेले दिसत आहेत. विरोधकांना असं वाटत होतं, नव्हे आजही वाटतं की सत्ता ही त्यांची मक्तेदारी आहे. एक चहावाला येऊन पंतप्रधान कसा होऊ शकतो... हे अजूनही त्यांच्या पचनी पडलेलं नाही. हा यांचा जो अहंकार आहे, त्याला जनतेने धक्का दिला. मग त्याचा राग आता विरोधक अशा मार्गाने काढताना दिसत आहेत. आपल्याला हवी तशी सत्ता मिळत असेल तरच निवडणुका होऊ द्यायच्या नाही तर निवडणुका नकोत, असा अत्यंत धक्कादायक आणि देशविघातक पवित्रा विरोधकांनी घेतलेला दिसत आहे. त्यांच्या या उपद्व्यापाचाच एक भाग म्हणजे सत्तेसाठी काढलेला हा असत्यांचा मोर्चा होय..!

संवैधानिक संस्थांवर हल्ले करणे, त्यांच्या विश्वासार्हतेला धक्का लावणे आणि निवडणुका होऊ देणार नाही असा इशारा देण्याचे प्रकार विरोधकांनी चालविले आहेत. निवडणुका हा संसदीय लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. जेव्हा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये यांना यश मिळालं, तेव्हा हीच मतदारयादी होती. तेव्हा कधी यांनी तक्रार केली नाही. विधानसभा निवडणुकीतही हीच मतदारयादी होती. निवडणूक लढून निर्णय लागेपर्यंत यावर कधीही आक्षेप घेतला नाही. मात्र, आता या लोकांनी फार मोठे गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. यांचा प्रश्न हा मतदारयादीतल्या तथाकथित घोळापुरता मर्यादित नाही. यांचं कसं झालं आहे, आमच्या मनाप्रमाणे झालं तर ठीक, नाहीतर निवडणूकच होऊ देणार नाही. राज ठाकरेंनी सार्वजनिक सभेतून तसे जाहीरच केले ना... ''निवडणुका कशा होतात ते मी बघतो'' म्हणून. महत्त्वाचं म्हणजे निवडणुका होऊ देणार नाही ही भाषा नक्षल्यांची आहे. आणि तीच भाषा आता हे लोक वापरत आहेत. हे आता अर्बन नक्षल्यांची भाषा वापरू लागल्याचे दिसते, असे म्हणायला वाव आहे. संविधान मान्य नाही, ते नष्ट करायचे. वैधानिक संस्था नष्ट करायच्या, संसदीय लोकशाहीचा आधार असलेल्या निवडणुकाच होऊ द्यायच्या नाहीत. हे प्रकार यापूर्वी नक्षलवादी नेहमी फलक, पत्रकं टाकून निवडणुकीवर बहिष्कार टाकून करायचे. कारण त्यांना संविधान मान्य नाही, लोकशाही मान्य नाही. त्यासाठी ते अशा पद्धतीने निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचं आवाहन करायचे. बसं... सारखा प्रकार करताना हे लोक दिसत आहेत. नक्षलवादी किमान लपून छपून निवडणुकीवर बहिष्काराची भाषा बोलायचे, हे लोक तर उघडपणे आता त्यांचीच भाषा करू लागले आहेत. एकीकडे नक्षलवादी शरण येत आहेत आणि अर्बन नक्षल उचल खात आहेत की काय असेच वाटू लागले आहे.

बरं हे निवडणुका घेऊ नका हे कोणत्या परिस्थितीत म्हणत आहेत. तर, सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका आटोपण्याचे निर्देश दिलेले असताना. याचा सरळ अर्थ विरोधक सर्वोच्च न्यायालयाला देखील मानत नाहीत, निवडणूक अयोगालाही मानत नाहीत, संसद, विधिमंडळालाही मानत नाहीत, कायदा व सुव्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या यंत्रणेलाही मानत नाहीत. विनापरवानगी मोर्चा काढला... मुळात यांच्या या एकूण वर्तनातून हे देशाचे संविधान आणि संसदीय लोकशाहीच उद्ध्वस्त करायला निघाल्याचे दिसते.

भारतीय लोकशाहीत विरोधी पक्ष असला पाहिजे, विरोधी पक्षाचा नेता असला पाहिजे. त्यांनी जनतेचे प्रश्न मांडले पाहिजेत, बाजू मांडली पाहिजे, सरकारच्या चुका दाखविल्या पाहिजेत. हे सगळं अपेक्षितच आहे. पण थेट मुळावरच घाव घालण्याचा प्रकार यांनी चालवला आहे. याला तर बेजबाबदारपणाचा कळसच म्हणावा लागेल.

मुळात हे सगळे लोक घराण्यातून पुढे आले आहेत. उद्धव ठाकरे आज एका पक्षाचे नेते का आहेत? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे चिरंजीव आहेत. राज ठाकरेंनी जरी मनसे हा पक्ष स्वबळावर स्थापन केला असला तरी, त्यांना एखादा पक्ष स्थापन करण्याइतकं बळ कुठून मिळालं? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे पुतणे आहेत. शरद पवार घराणेशाहीच चालवत आहेत. सुप्रिया सुळे, रोहित पवार, अजित पवार हे त्यांच्या घराणेशाहीची मूर्तिमंत उदाहरणं आहेत. काँग्रेस तर घराणेशाहीचा कळस आहे, हे वेगळ्यानं सांगण्याची गरज नाही. या लोकांना सगळं आयतं मिळालं असल्यामुळं संघर्ष माहिती नाही. जनता, जनतेचे प्रश्न, प्रत्यक्ष जमिनीवरील समस्या, लोकशाहीच्या तत्त्वांशी विसंगत वाटणे, अधिकारांचे उल्लंघन होणे, किंवा एखाद्या विशिष्ट धोरणाचे अपेक्षित परिणाम साध्य होत नसल्यास त्याचा वैधानिक पद्धतीने विरोध करण्याऐवजी हे लोक थेट व्यवस्थाच उद्ध्वस्त करायला निघाले आहेत. त्यामुळे हा विषय केवळ भारतीय जनता पक्षापुरता मर्यादित नाही, आपल्या भवितव्याचा प्रश्न आहे. संवैधानिक व्यवस्था उरली नाही, लोकशाही टिकली नाही, निवडणुका झाल्या नाही तर, आपलं, आपल्या देशाचं काय होईल? असा व्यापक गंभीर प्रश्न विरोधकांच्या या भूमिकेच्या निमित्तानं निर्माण झाला आहे.

सार्वजनिकपणे प्रात्यक्षिक दाखवून बनावट आधार कार्ड बनवायचं. आणि गुन्हा दाखल झाल्यावर त्याचं समर्थनदेखील करायचं. उद्या नोटा कशा छापायच्या याचंही प्रात्यक्षिक दाखवायला हे लोक मागेपुढे पाहणार नाहीत. वरून त्याचं समर्थनदेखील करतील. या भूमिकेला गुन्हेगारी नाही तर काय म्हणायचं. राहुल गांधींनी हायड्रोजन बॉम्ब फोडला... तेव्हा निवडणूक आयोगानं त्यांना केवळ तुमचे हे सर्व आरोप प्रतिज्ञापत्रावर सादर करा असं सांगितलं. पण आजवर राहुल गांधींनी ते दिलं नाही. मात्र, सत्याचा मोर्चा काढणाऱ्यांना आजवर शपथेवर सत्य बोलता आले नाही. कारण प्रतिज्ञापत्रावर तुम्ही खोटं बोलला, चुकीची माहिती दिली तर, शिक्षा होते. बाकी काही कळत नसलं तरी एवढं कदाचित राहुल गांधींना कळत असावं किंवा त्यांना त्यांच्या सल्लागारांनी समजावून सांगितलं असावं. बरं राहुल गांधी असोत किंवा मग हे दोन नौटंकी भाऊ असोत... यापैकी कोणीही वैधानिक, न्यायिक मार्ग स्वीकारताना दिसत नाही. बिहारमधील 'एसआयआर' विरोधात न्यायालयात गेल्यावर तोंडावर आपटणारे, हे विरोधक आता कोणीही न्यायालयात दाद माण्याच्या तयारीत नाहीत. कारण त्यांनी केलेल्या आरोपातले सत्य त्यांच्या मनाला माहिती आहे. त्यामुळे संविधानाने उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही मार्गाचा अवलंब न करता, जनतेच्या मनात विष पेरून, संवैधानिक संस्था उद्ध्वस्त करण्याचा यांचा डाव आता उघड झाला आहे.

त्यामुळे हा विषय केवळ आता भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस असा सत्ताधाऱ्यांच्या विरोधापुरता किंवा यांनीच विचार करण्यापुरता राहिलेला नाही. यावर आता तुम्ही आम्ही अर्थात सर्वसामान्य जनतेला, सामान्य मतदारांना विचार करायला भाग पाडणारा हा गंभीर विषय आहे. हे असं चालू द्यायचं का? यावर निर्णय आता जनतेला घ्यावा लागणार आहे. सत्ता मिळविण्यासाठी संपूर्ण देशाची व्यवस्था उद्ध्वस्त करणाऱ्या यांच्या षडयंत्राला जनता आता बळी पडणार नाही, एवढं मात्र निश्चित आहे. ▮▮

९२७०३३३८८६

### समाजरक्षकच गुन्हेगार झाले तर?

पोलिसांचे मुख्य कर्तव्य म्हणजे नागरिकांचे रक्षण, कायद्याचे पालन आणि समाजात शांतता व सुरक्षितता निर्माण करणे. मात्र, आज अशा घटना वारंवार घडताना दिसतात, ज्यात पोलिसच गुन्हेगार असल्याचे समोर येते. नुकताच मद्रास उच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात पोलिसांचा खोटारडेपणा उघड करून त्यांना दिलेली शिक्षा हे त्याचेच ठळक उदाहरण आहे. प्रकरण असे की, चेन्नईतील तीन पोलिस अधिकाऱ्यांनी अमली पदार्थविरोधी प्रकरणात एका निरपराध नागरिकाविरुद्ध खोटे पुरावे निर्माण करून खोटी साक्ष दिल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी उच्च न्यायालयाने या तिन्ही पोलिस अधिकाऱ्यांना १० लाख रुपयांचा दंड ठोठावला. एका निरपराध व्यक्तीला अडकवण्यासाठी पोलिसांनी जर असा कट रचला असेल, तर हे अत्यंत धक्कादायक आहे. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, या पोलिसांनी कायद्याची चौकट वाकवून न्यायव्यवस्थेचा गैरवापर केला. सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवर विश्वास असतो, कारण त्यांना वाटते की पोलिस त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना न्याय देतील. परंतु, चेन्नईतील या निकालाने हा विश्वास डळमळीत झाला असून नागरिकांचा भ्रमही दूर झाला आहे. अलिकडच्या काळात अशा अनेक घटना घडल्या आहेत. पूर्वी चोरी, धमकी, हत्या, बलात्कार असे गुन्हे केवळ गुंड करत असत; पण आता हीच कृत्ये काही पोलिसांकडून उघडपणे होताना दिसतात. फलटण येथे नुकत्याच घडलेल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणातही पोलिसांची गलिच्छ मानसिकता समाजासमोर आली आहे. पोलिस दल हे समाजाची संरक्षक भिंत आहे. परंतु या भिंतीला जर तडे गेले, तर समाज नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. हे गांभीर्याने लक्षात घेऊन गुन्हेगार पोलिसांविरोधात सरकारने कठोर आणि निष्पक्ष भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. पोलिसांची निवड करताना केवळ उंची, ५६ इंच छाती आणि वजन हेच निकष न ठेवता सद्सदविवेकबुद्धी, नीतिमत्ता आणि समाजहित या निकषांना प्राधान्य द्यायला हवे. कारण, जेव्हा रक्षक भक्षक बनतात, तेव्हा न्याय आणि सुरक्षिततेचा पाया डळमळतो. ▮

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## आजचे संघगीत-३०

रविवार, २ नोव्हेंबर २०२५

### वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा

वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा
ऐक्याचा नित सर्वत्रांनी जयजयकार करावा ॥धृ.॥

वेगळेच जरि वंशपंथ तरि असे एक आदेश
नकोत अमुच्या झेंड्याखाली भिन्न भिन्न गणवेश
कोनाकोनामधुनी यावे सुपुत्र झेंड्याखाली
महान त्यागानेच करू या भरतखंड बलशाली ॥१॥

सहिष्णुता अंगात बाणवा निंदु नका परक्यास
सहकाऱ्यांवर जीवेभावे राखा दृढ विश्वास
परस्परांतिल सर्व भेद हे विसरू या मोदाने
जाते घडि ही अपुली राखा अभंग एकोप्याने ॥२॥

कलह मिटावे परस्परांतिल ऐक्यबीज रुजवावे
ऐक्याच्या वट वृक्षावरती संघपुष्प विलसावे
स्वदेशसेवेवाचुनि दुसरा हृदयी भाव नसावा
शाखाशाखांमधुनी असला नित संस्कार घडावा ॥३॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४९६९८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परतीच्या पावसामुळे हाताशी आलेला कापूस मातीमोल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा परतीचा पाऊस झाल्यामुळे औंढा नागनाथ तालुक्यासह जिल्ह्यातील हाताशी आलेला कापूस मातीमोल झाला आहे. वेचणीस आलेल्या कापसाच्या पावसामुळे वाती झाल्या असून कापूस पूर्णपणे काळवंडला आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडल्याचे चित्र दिसत आहे.

जिल्ह्यात दि २९ आणि ३० आक्टोबर रोजी परतीचा पाऊस झाला. या पावसामुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा परतीचा पाऊस रविवारी पडला. औंढा तालुक्यात व धारखेडा परिसरात दिवाळी सणानिमित्त तसेच भाऊबीजेसाठी अनेक महिला माहेरी गेल्याने शेतकऱ्यांकडील कापूस वेचणीचे काम ठप्प झाले होते. दरम्यान, मागील आठवड्यापासून सुरू असलेल्या ढगाळ वातावरण आणि अधूनमधून पडणाऱ्या परतीच्या पावसामुळे शेतात राहिलेला कापूस भिजून मोठे नुकसान झाले आहे.

मजूर टंचाईमुळे आधीच शेतीचे काम अडथळ्यात आले असताना, पावसाने त्यात भर घातली आहे. परतीचा पाऊसामुळे शेतकरी हैराण झाला आहे. या पावसामुळे रब्बी हंगामातील शेतीची कामेही खोळंबली आहेत. सणाच्या काळात महिलावर्ग मोठ्या प्रमाणात माहेरी गेल्याने कापूस वेचणी पूर्ण होऊ शकली नाही. परिणामी, शेतात राहिलेला कापूस भिजून काळवंडला आहे. शेतकऱ्यांच्या उरल्यासुरल्या पिकांवर पावसाचे पाणी फिरल्याने आशेवर पाणी फेरले गेले आहे. त्यामुळे शेतशिवारात 'पांढरं सोनं काळवंडल्याचं चित्र सर्वत्र दिसून येत आहे. त्यातच आता परतीच्या पावसामुळे वेचणीला आलेला कापुस पुर्णतः भिजला तर आहेच, शिवाय काळा पडला असून कापसाच्या वाती झाल्या आहेत.

दरवर्षी कपाशीचे दर प्रती क्विंटल सात हजार रुपयाच्या पुढे सरकेनासे झालेले आहेत. त्यातच आता परतीच्या पावसाने कापुस भिजला असल्याने पांढरा कापुस काळा पडला असून खासगी व्यापारी कवडीमोल भावात कापुस खरेदी करत शेतक-यांची लुट करु लागले आहेत.

औंढा नागनाथ तालुक्यातील कपाशीचे वेचणीचे दर पहिल्याच वेचणीला दहा रुपये किलो असून, भिजलेला कापुस वेचणीस मजुरांची चणचण निर्माण तर झाली आहे. शिवाय वेचणीचे दर वाढते झाल्याने शेतक-यास वेचणीचा खर्च परवडणारा नाही.

# काँग्रेसचे माबुद बागवान यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

शहरातील गवळीपुरा, बागवानपुरा भागामधील काँग्रेसचे माजी नगरसेवक अब्दुल माबुद बागवान यांनी शनिवारी रात्री शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत प्रवेश घेतला. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

हिंगोली शहरातील भाजी मंडई भागामध्ये बागवान चॅरिटेबल ट्रस्ट हिंगोली यांच्या वतीने १ नोव्हेंबर रोजी आमदार संतोष बांगर व श्रीराम बांगर यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. यानिमित्त व्यासपीठावर माजी नगरसेवक सुभाष बांगर, गोविंद खंडेलवाल पैलवान, चंदू लव्हाळे, अँड. अविनाश बांगर, खली बांगर, बागवान पंच कमिटीचे सदर हाजी अब्दुल रशीद, नायब सदर महंमद यासीन मोहम्मद आझम, हाजी ईसा सेठ, हाजी ईसा राजा, हाजी आयुब राजा, मोहम्मद अजीज अब्दुल मजीद, समद शेठ गुलजार यांच्यासह ट्रस्टचे अध्यक्ष हाजी मोहम्मद रफीक हाजी अब्दुल कादर, उपाध्यक्ष अब्दुल मतीन अब्दुल शिकुर, सह उपाध्यक्ष मोहम्मद सादिक अब्दुल हमीद, सचिव मोहम्मद फारूक मोहम्मद नूर, कोषाध्यक्ष मोहम्मद इसा मोहम्मद नूर, सह-कोषाध्यक्ष मोहम्मद आसिफ मोहम्मद बशीर, सहसचिव मोहम्मद सिद्दिक मोहम्मद हमीद, आदींची उपस्थिती होती. यावेळी बागवान चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आमदार संतोष बांगर श्रीराम बांगर यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना आ. बांगर म्हणाले की, मी प्रत्येक वेळी काम करीत असताना कोणत्याही व्यक्तीचा धर्म अथवा जात न पाहता त्याची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळेच मुस्लिम समाजही आता शिवसेनेकडे अधिक आकर्षित झाला आहे. त्याचाच परिणाम यापूर्वी काँग्रेसमध्ये असलेले अब्दुल माबुद बागवान यांनी देखील शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदासह ज्या ज्या ठिकाणी शिवसेनेचे उमेदवार उभे केले जाणार आहेत त्यांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन आमदार बांगर यांनी शेवटी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुफ्ती जमीर अहमद, मुफ्ती अब्दुल खदिर यांनी केले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने बागवान बिरादरीच्या नागरिकांची उपस्थिती होती. आगामी नगर पालिका निवडणुकीत महायुतीतील शिवसेना आणि भाजपमध्ये चुरस निर्माण झाल्याचे चित्र पहावायस मिळत आहे.

# बार मालकाच्या गुंडांकडून मारहाण, कारवाई करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

तालुक्यातील आंबाळा शिवाराजवळ असलेल्या वानखेडे वाईन बार व रेस्टॉरंटच्या मालकाकडून गुंड जमा करून महिलांना मारहाण करण्यात आली असून संबंधित बार मालकावर कारवाई करावी तसेच अवैध धंदे बंद करावेत अशी मागणी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, आंबाळा जवळ असलेल्या वानखेडे वाईन बार आणि रेस्टॉरंटमध्ये अवैध वेश्याव्यवसाय सुरू आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी बार मालकाला वारंवार विनंती केली परंतु दि ३१ आक्टोबर रोजी महिला शेतात काम करीत असतांना वानखेडे बारच्या मालकाने २५ ते ३० गुंडांना बोलावून घाणेरड्या शिव्या देत मारहाण केली तसेच धमक्या दिल्या. यावेळी महिलांनी आरडाओरड केल्यामुळे गावातील नागरिक धावून आल्यानंतर गुंडांनी तेथून पळ काढला. संबंधित वाईन बार व लॉजवर सुरू असलेले अवैध धंदे बंद करण्यात यावेत तसेच संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण आडगावकर, आश्विनी लांडगे, कोमल इंगोले, दिपाली लांडगे, ज्योती लांडगे, आंबादास इंगोले, विलास इंगोले, रामदास इंगोले, प्रकाश इंगोले, साहेबराव लांडगे, भगवान लांडगे, ज्ञानेश्वर लांडगे, राजाराम लांडगे, सुदर्शन लांडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– येथील महात्मा गांधी चौकात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे अस्ताव्यस्तपणे बसत आहेत. त्यामुळे वाहतुकीला प्रचंड अडथळा निर्माण होत आहे. नगर पालिकेने मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा करूनही ही जनावरे रस्त्यावर फिरतांना दिसत आहेत. मोकाट जनावर व त्यांच्या मालकांवर कारवाई करण्याची मागणी सामान्य नागरिकांमधून होत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### केशव कोटकर यांचा शिवसेनेत प्रवेश



हिंगोली– हिंगोली विधानसभेचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या निवासस्थानी.केशव तुळशिराम पाटील कोटकर यांचा शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. हिंगोली विधानसभेचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी उपस्थित, युवा नेते रणजीत पाटील,द्वारकादा सारडा, अशोका चव्हाण, रामेश्वर शिंदे, चिंतामणी शिरसाट, कैलासराव ठोंबरे, भिकाजी कदम, रंगनाथ पाटील, वंसतराव अवचार, शंकर मसुडकर आदींची उपस्थिती होती. सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागल्याने मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश सोहळे होत आहेत.

### रिसाला बाजार रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य



हिंगोली– शहरातील वर्दळीचा असलेला रिसाला बाजार गणेशवाडी शाळा ते शिवाजी नगर, तहसील कार्यालय रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे या रस्त्यावरून वाहन चालकांना वाहने चालवितांना मोठी कसरत करावी लागत आहे. मागील दोन दिवसापूर्वी आणि रविवारी झालेल्या पावसामुळे या रस्त्यावरील खड्ड्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे उड्डाणपूलाचे काम अचानक बंद झाल्यामुळे तसेच या रस्त्याचे काम रखडल्यामुळे या भागात नेहमीच रस्त्यावरील खड्ड्यामुळे छोटे मोठे अपघात होत आहेत. या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची किंवा रस्ता बांधण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

### रविवारी दिवसभर हिंगोलीत पावसाची रिपरिप

हिंगोली– हिंगोली शहरासह परिसरात रविवारी सकाळी अकरा वाजल्यापासून परतीच्या पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावली होती. या पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले होते तसेच जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसत होते.

# अक्षय साईपात्र अन्नछत्राला जिल्हाधिकाऱ्यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

येथील सामान्य रूग्णालयात मागील अनेक वर्षापासून गोरगरीब रूग्ण व त्यांचे नातेवाईकांसाठी अक्षय साईपात्र अन्नछत्रच्यावतीने मोफत अन्नदान करण्यात येत आहे. या अन्नछत्राला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शनिवारी भेट दिली.

येथील शासकीय रूग्णालयात अनेक वर्षापासून अक्षय साईपात्र अन्नछत्रचे स्वयंसेवक ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब आणि गरजु रूग्णांना मोफत अन्नदान करीत आहेत. हे कार्य अविरतपणे मागील अनेक वर्षापासून येथील स्वयंसेवक करीत आहेत. या अन्नछत्राला जिल्हाधिकारी गुप्ता यांनी भेट दिली तसेच रांगेत उभे असलेल्या गोरगरीबांना त्यांचेहस्ते अन्नदान करण्यात आले. यावेळी गुप्ता यांनी अन्नछत्राची माहीती घेत स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी अन्नछत्रामध्ये काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचेही कौतुक केले.

# दिवाळी सण संपताच ऊसतोड कामगार निघाले कारखान्यांकडे, वाडे-तांडे पडले ओस




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

यावर्षी अतिवृष्टी मोठ्या प्रमाणात झाली. या अतिवृष्टीचा फटका शेती पिकांना बसला. नद्यांना पुर आले होते. पावसामुळे रस्ते खराब झाले होते. उसाच्या फडात काही दिवस पाणी असल्यामुळे उसतोडणीचा हंगाम लांबला. आता नोव्हेंबर महिन्यात साखर कारखाने सुरू करण्यात आले आहेत. दिवाळीचा सण झाल्यानंतर मजूर उसतोडणीसाठी कारखान्याकडे कुच करू लागले आहेत. दररोज अनेक वाहने औंढा नागनाथ, हिंगोली, पुसद जिल्ह्यातून इतर जिल्ह्याच्या ठिकाणी जात असल्याचे दिसून येत आहे.

हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगार आहेत. गावात हाताला काम नसल्यामुळे हे कुटुंब दिवाळीनंतर साखर कारखान्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. परतीचा पाऊस ऑक्टोंबर महिन्यात अतिवृष्टीजन्य झाला. त्यामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. रस्ते खराब झाले, नद्यांना आजही पाणी वाहत आहे. उसाच्या फडात काही दिवस पाणी आहे. त्यामुळे साखर कारखाने उशिराने चालू झाले आहेत. दरवर्षी उसतोड मजुरांची दिवाळी उसाच्या फडात होत असते यंदा मात्र मजुरांची दिवाळी गावाकडे झाली आहे. आज साखर कारखाने सुरू झाल्याने मजुर उसतोडणीला जात आहेत. दररोज ट्रॅक्टर, ट्रकद्वारे मजुर कारखान्याकडे जात असल्याचे दिसून येत आहे. ट्रॅक्टरमध्ये संपूर्ण कुटुंब बाडबिस्तरा धेवून कामासाठी कारखान्याकडे जात असतांना दिसत आहेत. महाराष्ट्रासह कर्नाटक या राज्यातही उसतोडणीसाठी जात आहेत. मजुर उसतोडणीला जावू लागल्याने डोंगरी भागातील गावे व वाडे तांडे ओस पडू लागले.

# सुंदर हस्ताक्षर कार्यशाळेचे आयोजन





सुंदर हस्ताक्षर चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा दागिना आहे असे महात्मा गांधी म्हणायचे त्याच अनुषंगाने प्रत्येक विद्यार्थ्याचे हस्ताक्षर चांगले व्हावे याकरिता ही सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेण्यात आली.

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

हिंगोलीत सुंदर हस्ताक्षर कार्यशाळेचे आयोजन आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवघ्या पाच दिवसांत विद्यार्थ्यांनी इंग्रजी व मराठी वळणदार अक्षरांचे धडे गिरवले.

सुंदर हस्ताक्षर शिक्षक पांडुरंग चोपडे यांनी विद्यार्थ्यांना हस्ताक्षर विषयी मार्गदर्शन केले. त्यामध्ये पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला शंभर विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरामध्ये बदल घडून आला. विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षर पाहून पालकांनी सुद्धा अभिनंदन केले. या कार्यशाळेला गटशिक्षणाधिकारी दत्तराव नांदे भेट दिली. विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर बघून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावर्षीची दिवाळी विद्यार्थ्याच्या हस्ताक्षरामध्ये सुधारण्याकरिता साध्य ठरली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विनर्स कोचिंग क्लासेसचे संचालक भागवत सावंत व अमोल खटके हस्ताक्षर तज्ञ पांडुरंग चोपडे, सौ. मीना नांदे उपस्थित होत्या.विद्यार्थ्यांना दिवाळीचे गोड हस्ताक्षर काढा असे धडे देण्यात आले. कारण आली.मागील अनेक वर्षापासून पांडुरंग चोपडे यांनी अनेक शाळांमधून सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेत विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरांमध्ये अमुलाग्र बदल केला आहे. त्यांच्या कार्याबद्दल गटशिक्षणाधिकारी नांदे यांनी त्यांचे कौतुक केले. यावेळी पालकांनीही समाधान व्यक्त केले तर विद्यार्थ्यांनी त्यांच्या हस्ताक्षराबद्दल आनंद व्यक्त केला.

# रूग्णालयातील पिण्याच्या पाण्याची टाकी रिकामीच



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ नोव्हेंबर**

येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी नवीन पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. परंतु टाकीभोवती अत्यंत घाण साचल्यामुळे तसेच या टाकीत पिण्याचे पाणी मिळत नसल्यामुळे रूग्णासह नातेवाईकांना बाहेरून पाणी विकत आणावे लागत आहे. याकडे सामान्य रूग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. कोट्यावधी रूपये खर्च करून जिल्हा सामान्य रूग्णालय तसेच शासकीय महाविद्यालयाचे काम व इतर इमारतींचे काम करण्यात येत आहे परंतु रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यामध्ये सामान्य रूग्णालय प्रशासन डोळेझाक करीत आहे. या समस्येकडे वरिष्ठांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

डॉ. हेडगेवार ग्रामीण अकृषक सहकारी पतसंस्था मर्यादित नाचणगांव (मुख्यालय)
स्थापना 1998
आमच्या शाखा : नाचणगांव (मुख्यालय), वर्धा, हिंगणघाट, आर्वी, सेलू, नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली आणि अकोला
बचत खाते व्याज दर ५%
मुदत ठेव व्याज दर १०.५%
आपल्या शहरातील शाखेला अवश्य भेट द्या.
संस्थापक अध्यक्ष : डॉ. जयंत ओक, मो. 9764648383

## कव्हर स्टोरी

# महिला अत्याचारातील चिंताजनक वाढ

डॉ. वर्षा गंगणे/९४२२१३४८०७

पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांच्या भावना, कर्तृत्व, बुद्धीमत्ता, शौर्य, साहस आणि कार्यक्षमता या सगळ्याच गुणांना पडद्याआड कसे करता येईल? पण, याचाच प्रयत्न केला जातो. याला तिच्या अस्तित्वाचे भय, तिच्या क्षमतेचे दडपण, पुरुषाच्या पुढे जाण्याची धास्ती की, स्त्रीप्रधान पद्धती रूढ होण्याची स्थिती यापैकी काहीतरी असा मुद्दा आहे की, ज्यामुळे तिला बौद्धिक, मानसिक, शारीरिक यापैकी कोणत्याही स्वरूपात मागे ठेवण्याची मानसिकता पुरुष समूहात वाढत गेली आणि महिलांना मागे ठेवण्यासाठी अत्याचारांचा आधार घेण्यात आला. तिची वारंवार मुस्कटदाबी करण्यात आली, कोंडमारा करण्यात आला. याची दखल घेत यांवर उपायात्मक धोरण व कायदे तयार करण्यात आलेत. पण, ते काटेकोरपणे अंमलात आले नाहीत. त्यामुळे, गुन्हेगारांच्या मनात दहशत निर्माण न होता, तिच्याच मनात धास्ती निर्माण करून तिला दूर लोटण्याचे प्रयत्न अधिक झालेत.

वर्तमान युग संगणकाचे, कृत्रिम बुद्धीमत्तेचे, विकासाचे, समानतेचे म्हणविले जात असले तरी महिला वर्गाला जाणून मागे ठेवण्याचे प्रयत्न ताकदीनिशी आणि सामूहिकरीत्या केले जात आहेत. महिलांचे युग आले किंवा ते येणार असे वाटू लागले असतानाच, देशाच्या एखाद्या कोपऱ्यातून महिलेवर झालेल्या अत्यंत क्रूर, बीभत्स आणि अंगावर शहारे आणणारी घटना समोर येते. यामुळे संपूर्ण महिला वर्गात किंवा तिच्याशी निगडीत समूहात दहशतीचे वातावरण निर्माण होते. परिणामी मुलींना बाहेर पाठवायला पालक धजावत नाहीत किंवा मुली बाहेर जाण्यास तयार होत नाहीत. त्यांच्यात एकप्रकारची घबराट निर्माण होते. विशिष्ट समाजात मुली व महिलांसाठी अनेक निर्बंध लावणारी सामाजिक चौकट तयार होते.



**विकासाचे आराखडे मांडतांना महिला हा घटक दुर्लक्षित करून चालणार नाही कारण, एकूण लोकसंख्येतील निम्मा वाटा तिचाच आहे. संख्यात्मक दृष्ट्या तिचा वाटा अर्धा असला तरी, मानसिकदृष्ट्या तिची कुचंबणा अजूनही होतेच आहे. गेल्या काही दिवसांत महिलांवरील लैंगिक, मानसिक आणि शारिरीक अत्याचारांच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. विकासाच्या प्रशस्त राजमार्गावर चालताना, निम्मी लोकसंख्या अशा रितीने मागे राहणार असेल तर नितीमूल्ये आणि संस्कारांच्या प्रभावाचा विचार करून दूरगामी परिणाम साधणारे निर्णय घ्यावे लागतील.**

महिलांच्या जीवनाची दोरी पुरुषांच्या हाती असणारे वातावरण सहज तयार होते व ते दबक्या पावलांनी प्रचलितही होते. ते तसेच टिकवून ठेवण्यासाठी महिलांवरील अत्याचारात सातत्य राखण्याचा प्रयत्न केला जातो. महिलांना शारीरिक, मानसिक त्रास देणे, अन्याय करणे किंवा अत्याचार करून उपेक्षित करणे यांत काहीच गैर मानले जात नाही. त्यामुळे, महिलांना दुय्यम स्थानी ठेवण्याची परंपरा रूढ होते व तिच्यावरील अन्यायाचे संस्कार रुजतात. हे इतके बेमालूम व सहज होते की, यावर कोणीही कोणतेही आक्षेप घेत नाहीत. तिच्यावरील अन्याय व अत्याचाराबाबत कुठे वाच्यता झाल्यास हा आमच्यातला, आमच्या कुटुंबातला, समाजातला किंवा नात्यातला प्रश्न आहे. तुम्हाला काय करायचंय? असे म्हणून विचारणाऱ्यांची तोंडं बंद केली जातात. बदनामीच्या भयाने पालक पोलिसात तक्रार करीत नाहीत. पैशाच्या बळावर गुन्हेगार मोकाट फिरतात. महिला संघटना, मंडळे व आयोग कुचकामी ठरतात किंवा कुठल्या दबावाचे बळी ठरतात. अनेकदा असे दिसून आले की, पोलिसांच्या संरक्षणात देखील युवती व महिला सुरक्षित नाहीत. फलटणच्या डॉक्टर युवतीच्या आत्महत्येचा घटनाक्रम अजून पुरता उघड झालेला नाही. त्यांना न्याय मिळायला बराच काळ लागतो. कायद्यातून पळवाटा काढल्या जातात. तिचे मनोधैर्य खचविण्याचा प्रयत्न आप्तस्वकीयच करतात. तिची स्वसुरक्षेसाठी लढण्याची ताकद कमी करण्यात येते. या व अशा अनेक कारणांमुळे ती निमूटपणे तिच्यावर होणारे अत्याचार सहन करते किंवा मरणाला जवळ करते. काही प्रकरणांमध्ये तिला संपविण्याचेही प्रयत्न केले जातात. हेच आजचं वास्तव व शोकांतिका आहे.



महिलांवरील अत्याचारातील वाढ पण, न्यायालयीन प्रक्रीयेतील विलंबामुळे गुन्हेगारांना कठोर शिक्षा न झाल्यामुळे कायद्याचा धाक राहिलेला नाही. महिला अत्याचारांबाबत काही आकडेवारी समोर आली आहे जी अत्यंत धक्कादायक आहे. विविधप्रकारे तिच्यावर केले जाणारे अत्याचार किती हिडीस आणि ते करणारे किती कोत्या मनोवृत्तीचे आहेत, ते या आकडेवारीवरून सहज स्पष्ट होते. याकडे केवळ आकडेवारी म्हणून न बघता, एका व्यक्तीचे जीवन उध्वस्त होण्याची घटना म्हणून बघणे आवश्यक आहे. देशात दरवर्षी ४.५ लाख महिला अत्याचाराच्या बळी ठरतात. महाराष्ट्रासारखे पुरोगामी म्हणविणारे राज्य महिला अत्याचारांच्या घटनांबाबत दुसऱ्या स्थानावर आहे. महिला कौटुंबिक हिंसाचाराच्या अधिक बळी ठरतात. पती आणि नातेवाईक पुरुषांकडून स्त्रीवर्गावर सर्वाधिक अत्याचार केले जात असल्याचे संबंधित आकडेवारी सांगते.

हल्ली लग्नासाठी मुलींच्या अपहरणाचे प्रमाण वाढले आहे. एकूण लोकसंख्येत मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे सामाजिक असंतुलन निर्माण झाले आहे. लग्नासाठी वधू मिळेनाशी झाली आहे. परिणामी मुलींचे अपहरण करून, त्यांना इतर राज्यात नेऊन लग्न लावून देण्याचे प्रमाण वाढले आहे. वर्ष २०२२ मध्ये १,०७,५८८ अपहरणाची प्रकरणे होती ती वाढून वर्ष २०२३ मध्ये १,१३,५६४ इतकी झाली. यापैकी ६६,३६८ मुली सापडल्याच नाहीत. बलात्कार प्रकरणात नाबालिग मुलींची संख्या ८७९ असून बालिग महिलांचे प्रमाण २८,८२१ इतके आहे.

महिला अत्याचारांचे समाजाच्या विविध स्तरांमधून व देशाच्या कानाकोपऱ्यातून समूळ उच्चाटन करायचे असेल तर मुलींचे आत्मबळ वाढविणे व त्यांना स्वसंरक्षणाचे धडे देणे आवश्यक आहे. इतरांच्या मदतीची वाट पाहण्याऐवजी स्वतःच्या मानसिक व शारीरिक बळाचा उपयोग अधिक सक्षमपणे कसा करता येईल याचाच विचार करण्याची गरज आहे.

मुलगा-मुलगी भेद करण्याची मानसिकता घराघरांतून संपून मुलींना घरात समान वागणूक दिल्यास, तिला बरोबरीचे स्थान व दर्जा दिल्यास तिच्यावरील निम्मे अत्याचार कमी होतील. महिला व मुलींवरील अत्याचारांना वाचा फोडण्यात यावी. पीडित स्त्रियांना सन्मानजनक वागणूक घर व समाजात मिळावी. स्त्रियांनीच स्त्रियांना सकारात्मक पाठिंबा दिल्यास परिस्थितीत नक्कीच बदल घडतील.

### महिलांवरील अत्याचारात सातत्याने वाढ होत आहे. खालील आकड्यांवरून हे अधिक स्पष्ट होईल.

| वर्ष | महिला अत्याचार घटना |
|---|---|
| २०२१ | २,२८,२७८ |
| २०२२ | ४,४५,२५६ |
| २०२३ | ४,४८,२११ |

देशात दर तासाला ३ आणि दर २० मिनिटाला एका महिलेवर बलात्कार होतो. वर्ष २०१२ मध्ये महिलांवरील अत्याचाराच्या २.४४ लाख गुन्ह्यांची नोंद झाली होती तर २०२२ मध्ये ४.४५ लाखांपेक्षा अधिक प्रकरणे नोंदविण्यात आली होती. महाराष्ट?ात सध्या महिलांविषयक २ लाख १५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी, १ लाख ७८ हजार प्रकरणे निकालांच्या प्रतीक्षेत आहेत जी महिला अत्याचारांबाबत आहेत.

दूषित समाजव्यवस्था व पुरुषसत्ताक मानसिकता यामुळे नाईलाजाने अनेक महिला न्यायालयीन लढ्यातून माघार घेतात अन् आरोपी मोकाट सुटतात.

#### महिलांवरील अत्याचारांचे स्वरूप

| गुन्ह्याचा प्रकार | प्रकरणे |
|---|---|
| पती/नातेवाईक | १,३३६७६ |
| अपहरण | ८८,६०५ |
| गैरवर्तन/छेडखानी | ८३,८९१ |
| बलात्कार | २९,६७० |
| हुंडाबळी | ६,१५६ |
| आत्महत्येस प्रवृत्त करणे | ४,८२५ |
| अश्लील टिपणी | ८,८२३ |
| बलात्काराचा प्रयत्न | २७९६ |
| ॲसिड हल्ले | ११३ |

**मागील ३ ते ५ वर्षात महिला अत्याचारांचे प्रमाण वाढत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. राज्यनिहाय हे प्रमाण कमी-अधिक दिसून येते. यासाठी खालील काही आकडे पुरेसे बोलके आहेत.**

| राज्य | अत्याचारांचे प्रमाण |
|---|---|
| उत्तर प्रदेश | ६६,३८१ |
| महाराष्ट्र | ४७,१०१ |
| राजस्थान | ४५,४५० |
| मध्यप्रदेश | ३२,३४२ |
| पश्चिम बंगाल | ३४,६९१ |

# सातवीण... सप्तपर्णी

डॉ. माधुरी वाघ/ ९४२२१०९९९३

माणसांच्या बाबतीत 'व्यक्ति तितुक्या प्रकृती' असे आपण संबोधतो तसेच वैविध्य, विविधता वनस्पतींमधेही असते. कोणत्याही दोन वनस्पतींच्या पाना, फुलाफळांमधे साम्य नसते. प्रत्येक वनस्पतीच्या रचनेत काहीतरी वैशिष्ट्य असते त्यावरून त्यांचे नामकरणही होते, ओळख पटते. अशीच ही एकत्र सात पाने असणारी सप्तपर्णी.

काही वनस्पतींची पाने एकान्तर म्हणजे एका ठिकाणी एकच पान तर काहींची दोनदोन पाने समांतर असतात. पण सप्तपर्णी, सावर यांची सात पाने एकाच अग्रावरून निघतात, म्हणून ती सप्तपर्णी. क्वचित एकाच अग्रावर सहा किंवा आठ पानेही असतात. सावर (शाल्मली) व सप्तपर्णीच्या पानांची रचना सारखी असल्यानेच आयुर्वेदात एक श्लोक आला आहे.

**सप्तपर्णीः शाल्मलीसदृश्यपत्रो**
**गजमदगंधपुष्पः शरदि**
**विकसनशीलः उच्चैवृक्षः**
**किंवा**
**सप्तपर्णो गुच्छपुष्पो बहुत्वकब शाल्मलिच्छदः।**

सात पाने एकाच देठावरून चक्राकार रचनेत येणाऱ्या या सप्पपर्णीचा सदाहरित वृक्ष ४०-५० फूट उंचीपर्यंत वाढतो. याचे खोडसुद्धा ७-८ फुटांपर्यंत जाड होते. खोडाची त्वचा, साल बाहेरून भुरकट पांढरट तर आत पिवळसर असते. याचे खोड कापल्यास, फांद्या वा पाने तोडल्यास तेथून दुधासम स्त्राव निघतो म्हणुनच सप्तपर्णीला 'मिल्कवुड ट्री' असे म्हणतात.

पाने साधारणतः ४ ते ६ इंच लांब तर १ ते दीढ इंच रुंद असतात. पानांचा वरील पृष्ठभाग छान मऊ, स्निग्ध, हिरवाकंच असतो तर खालील पृष्ठभाग पांढरट असतो.

शरद ऋूत ही सप्तपर्णी पानोपान दाट घट्ट फुलांनी गुच्छागुच्छांत फुलते. इतर झाडांप्रमाणे ही फुलं रंगीबेरंगी किंवा सुगंधी नसलीत तरीही शरद ऋूत हिरव्या पोपटी पांढरट रंगाच्याफुलांच्या गुच्छांनी पानोपानी बहरलेला सप्तपर्णीचा वृक्ष वाटसरूंना आकर्षित करतो, काही क्षण तर नक्कीच या वृक्षावर नजर खिळतेच. म्हणुनच सप्तपर्णीला ङ्गशारदङ्क असेही म्हणतात. हे फुलांचे गुच्छ मंजिरीस्वरूपात येतात. पानांची रचना सात या विषम संख्येत असल्यामुळेच या वृक्षाला ङ्गविषमच्छदङ्क असे नाव आहे.

सप्तपर्णीला आपण मराठीत ङ्गसातविणङ्क म्हणतो तर हिंदीत 'छितवन' वा 'सतौना' असे म्हणतात.



याचे वनस्पतिशास्त्रीय नाव "Alstonia scholaris" असून याची फॅमिली "Apocynaceae" आहे. कुटजकुलातील ही वनस्पती आहे. इंग्रजीत या वृक्षाला "Dita", Blackboard Tree वा Scholar Tree असे म्हणतात.

सप्तपर्णीच्या वृक्षाखालीच जैन धर्मातील द्वितीय तीर्थंकर अजितनाथ भगवान यांना संपूर्ण ज्ञानप्राप्ती झाली अशी जैन धर्मात मान्यता आहे.

डिसेंबरमध्ये फुलांचे जागी लांबलांब शेंगा लोंबकाळलेल्या दिसतात. साधारणतः १-२ फूट लांबीच्या, चपट्या, अर्धगोलाकार शेंगा या युग्म म्हणजे एकाच देठावर दोन शेंगा जोडून येतात. यावेळीही हवेच्या झुळुकीने झोके घेणाऱ्या या शेंगांच्या झुबक्यांमुळेही सप्तपर्णी वृक्ष अत्यंत मनमोहक दिसतो.

सावरी प्रमाणप्रमाणेच या शेंगाही रुईने पूर्ण आच्छादित असून आत पांढऱ्या छोट्या बिया असतात. शेंगा कच्च्या असतांना हिरव्या असतात.नंतर पिवळ्या होतात व वाळल्यावर कथ्या होतात.वाळल्यावर शेंगा स्वताफुटून रुईसह बिया हवेत उडून सर्वत्र पसरतात.जानेवारी च्या सुमारास नागपूरच्या रस्त्यांवरही कापूस धरून इवल्या इवल्या बिया उडतांना दिसतात .काटेसावरीचा कापूस असाच उडतो मात्र तो मे मध्ये उडतो.संधी मिळताच ,या बिया निसर्गाच्या सानिध्यात जमिनीत रूजतात व तेथे नवीन सातविण उगवते.वृध्दिंगत होते. सप्तपर्णी भारतात सर्वत्र आढळते.सध्यातर पर्यावरण प्रेमी रस्त्याच्या कडेने ही झाडे लावून रस्ता शोभायमान करतात व सावलीसाठी निवाराही होतो.

सप्तपर्णीत अल्पशी विषाक्तता असली तरी ही ती आयुर्वेदातील 'ज्वरनाशक' अशी उपयोगी औषधी वनस्पती आहे. औषधी म्हणून उपयोगी असा या झाडाचा एकमेव भाग म्हणजे खोडाची साल (काण्डत्वक) ही आहे. यात डिटेमीन, एकिटीन, एकिटेनीन हे रासायनिक घटक आहेत. ही साल कडू, तुरट व गरम असते. तरीही याने एक दिवसाआड येणारा विषमज्वर कमी होतो. विषमज्वरात चूर्ण वा काढा स्वरूपात ही सातविणसाल वापरण्यात येते. बाजारात 'विषमच्छद चूर्ण' व 'सप्तपर्णी काढा' या नावाने उपलब्ध आहे.

या सालीचा दुसरा महत्वाचा उपयोग प्रसवोत्तर महिलांसाठी होतो. हे चूर्ण दुधात उकळून घेतल्याने बाळंतिणीची भूक, जेवण वाढून स्तन्य वाढते. त्यामुळे बाळाचे छान पोट भरून बाळाची अंगकाठी गुटगुटीत होते. ज्वराप्रमाणे त्वचाविकारांवरही सप्तपर्णी उत्तम औषधी आहे. सप्तपर्णीच्या सालीचे काढ्याने व्रण धुतल्यास रोपण लवकर होते. त्वचाविकारात साल उगाळून लेपही लावावा. रक्तविकारातही उपयोग सांगितला आहे. सप्तच्छदादि चूर्ण, क्वाथ, तैल हे बाजारात उपलब्ध आहेत. आयुर्वेदातील विषमरज्वरघ्नासाठी उपयुक्त, उपद्रव न करता ज्वरानंतरचे दौर्बल्य कमी करणारी सर्वोत्तम औषधी वनस्पती म्हणजे सप्तपर्णी आहे.

# तुळशीचे पान त्रिभुवना समान...

## तुळशी विवाह महत्त्व

**दैनिक तरुण भारतच्या सामूहिक तुळशी विवाह सोहळ्यांना उद्यापासून संपूर्ण विदर्भात सुरुवात होते आहे. विविध संस्था, महिला मंडळं, मंदिर व्यवस्थापन यांच्या माध्यमातून आयोजिण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळत असलेल्या उदंड प्रतिसादाने पुन्हा एकदा दिवाळीचे चैतन्य निर्माण झाले आहे. पर्यावरणपूरक अशा या उपक्रमात आपण सर्वच सहभागी झालो आहोत. हे औचित्य साधून तुळशी विवाहाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी हा लेखनप्रपंच!**



आपल्या धर्मशास्त्रानुसार, कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या द्वादशीपासून पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाह साजरा करण्याची आपली परंपरा आहे. तुळशी विवाह म्हणजे तुळशीचे रोप अर्थात (वृंदावनाशी) तसेच भगवान विष्णूचे शालिग्राम रूप (कृष्ण/विष्णू) यांचा विवाह लावण्याचा सोहळा साजरा करणे! या प्रतिकात्मक राधा-दामोदर तुळशी विवाह सोहळ्यानंतरच विवाह मुहूर्त देखील सुरू होतात. याचे कारण भगवान विष्णू भारतीय परंपरेत तुळशी विवाहाशी अजून एक गोष्ट जोडलेली आहे व ती म्हणजे एकदा तुळशीचं लग्न झालं की, लग्नाचे मुहूर्त सुरू होतात.

आरोग्य शास्त्राच्या दृष्टीनी ही प्रथा अतिशय समर्पक आहे. दीपोत्सवानंतर अग्नीचं बल जसजसं वाढतं तसतशी शरीरशक्तीत सुधारणा होते आणि त्यामुळे हा काळ स्त्रीपुरुषांच्या मिलनासाठी आदर्श ठरतो. गर्भसंस्कारामध्येही उत्तम अपत्य प्राप्तीसाठी हेमंत ऋतू सुचवलेला आहे. या बद्दल एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. शंखचुडाने जिगीषत्य मुनींच्या उपदेशावरून कठीण तप करून ब्रह्मदेवांना प्रसन्न करून घेतले. देवाने त्याला कधीही जिंकू नये असा वर मागून घेतला. ब्रह्मदेवांनी त्याला तपश्चर्येच्या फलस्वरूप श्रीकृष्णकवच व इच्छित वर प्रदान केला. त्यानंतर शंखचुडाने धर्मध्वजाची कन्या तुळशी हिच्याशी बदरिकाश्रमात गांधर्व पद्धतीने विवाह केला. त्यानंतर ते दोघे सुखाने कालक्रमण करू लागले.

त्यानंतर, शुक्राचार्यानी शंखचुडास देव व दानव यांच्या वैर भावाबद्दल माहिती देऊन त्यास आसुरांचे व दानवांचे अधिपत्य देऊन त्यास अभिषेक केला. राज्यविस्ताराकरिता शंखचुडाने इंद्रपुरीवर चढाई केली. अजिंक्य राहण्याच्या वरदानामुळे व राक्षसांच्या प्रचंड सेनेसमोर देवांचा निभाव लागला नाही. असह्य होऊन देवांनी रणांगणातून पळ काढला. शंखचुडाने मोठा विजय मिळवून स्वर्गावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. त्यानंतर तो त्रिभुवनावर राज्य करू लागला. शंखचुड नेहमी कृष्णभक्तीत रममाण असे.

नचिकेत काळे /९०२८३३५२३५

पराभूत झालेले देवगण हताश होऊन वैकुंठात श्रीहरीकडे गेले. तिथे त्यांनी शंखचुडाचा सर्व वृत्तांत श्रीहरींना सांगितला. ते ऐकून, शंखचूड हा माझेच रूप असलेल्या श्रीकृष्णाचा गोप असून तो कृष्णभक्तीतच लीन असल्यामुळे, त्याचा वध मी करणे शक्य नाही असे श्रीहरींनी सांगितले व सर्वांना घेऊन शिवलोकी गेले. नंतर, शंखचुडाच्या रूपाने जेव्हा श्रीहरी तुळशीच्या सान्निध्यात आले, त्यावेळी युद्धाचा सर्व वृत्तांत ऐकून ती प्रसन्न झाली. ती निःशंक होऊन त्यांच्याशी रममाण झाली. पण, यथावकाश त्यांच्या प्रणयाचा आणि आकर्षणाचा निराळाच प्रकार पाहून तिला संशय आला. हा शंखचूड नाही, हे तिच्या लक्षात आले. ती संतापली व शाप देऊ लागली. तेव्हा शापाच्या भयाने श्रीहरी आपल्या मूळ रूपात आले. शंखचूडाला मारण्यासाठी श्रीहरीने केलेल्या कपटाबद्दल तुलसीने श्रीहरींनी पाषाण होण्याचा शाप दिला. आपण धर्मभ्रष्ट झालो ही कल्पना तिला सहन होत नव्हती. ती शोकार्त होऊन विलाप करू लागली. तिची अवस्था पाहून न राहवून श्रीहरींनी शिवाचे स्मरण केले. तुळशीला रडताना पाहून शिवप्रभू म्हणाले,'सती, तू रडू नकोस. हा देह सोडून तू दिव्य देह धारण कर आणि नित्य श्रीहरीच्या संगतीत राहा. त्यांचा सहवास हेच तुझ्या तपाचे पुण्यफळ आहे. तू या देहाचा त्याग करताच त्याचे गंडकी नदीत रुपांतर होईल. पावन आणि पुण्यरूप म्हणून तिला विशेष मान्यता मिळेल. हे देवी! तू तुळशीचा वृक्ष होशील. माझ्या वरदानाने तुळशीला देवपूजेत महत्त्वाचे स्थान मिळेल. तुझ्या शापाप्रमाणे श्रीहरी गंडकी नदीच्या तीरावर पाषाण रुपाने राहतील. तीक्ष्ण दातांचे कोट्यावधी कीटक त्या पाषाणाला भेदून त्याच्या तुकड्यांमध्ये चक्रे तयार करतील. अशाप्रकारे त्या पुण्यदायक शाळीग्राम शिळा होतील. त्यांच्यातील चक्रांच्या फरकाप्रमाणे त्या लक्ष्मी किंवा नारायण म्हणून ओळखल्या जातील. जो मनुष्य देवघरात शाळीग्रामाची पूजा करून त्यास तुळस अर्पण करेल तो पुण्यवान होईल. जो महाज्ञानी पुरुष शाळीग्राम, शंख आणि तुळस एका जागी एकाच स्थानी ठेवील तो विष्णूंना प्रिय होईल.

त्यांचे कल्याणप्रद बोलणे ऐकून, तुळशीचे दुःख नाहीसे झाले. प्रसन्नतेने तो देह टाकून तिने दिव्य देह धारण केला, तिला घेऊन कमलापती वैकुंठास गेले. तिच्या पूर्व देहापासून गंडकी नदी उत्पन्न झाली. तिच्या दोन्ही तटांवर श्रीहरी मनुष्यांना पुण्य प्रदान करणाऱ्या शिळांच्या रुपाने राहिले. तुळस ही रोग प्रतिकारक वनस्पती आहे. अश्या सर्वगुण संपन्न तुळशी पुढे आपण अंधार कसा काय ठेवू शकतो. तिथे दिवा घरात सकारात्मक परिणाम दिसून येतो. तेव्हा अनेक तुळशीवृक्ष लावू या!

## संक्षिप्त वृत्त...

### रन फॉर युनिटीला गंगाखेडकरांचा प्रतिसाद



**गंगाखेड,/प्रतिनिधी :** लोहपुरुष स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या.जयंती निमित्त पोलिस दल व गंगाखेड पोलीस ठाण्याच्या वतीने (दिनांक ३० ऑक्टोबर गुरुवार) रोजी सकाळी ६ वा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर रन फॉर युनिटी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम गंगाखेड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.यावेळी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर,उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र शिरतोडे,तहसीलदार उषाकिरण श्रंगारे आदींची उपस्थिती होती.

रन फॉर युनिटी कार्यक्रमास शहरातील सर्वयोग कक्षेचे योग शिक्षक,साधक, रॉयल अँकॅडमीचे संचालक प्रशिक्षणार्थी विद्यार्थी पोलिस ठाण्याचे कर्मचारी,लायन्स क्लबचे पदाधिकारी,सामाजिक संस्थांचे सदस्य, शहरातील सुजाण नागरिक आदींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अधिकारी कर्मचारी व सर्व नागरिकांनी सकाळी तीन किलोमीटर धावून सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी केली याप्रसंगी जीवराज डापकर,श्रीकांत डोंगरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचा उद्देश सांगितला या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पदूदेव जोशी यांनी केले तर आभार योगगुरू प्रकाश डिकळे यांनी मानले या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् ने करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले.

### बेलदार समाज संघ तालुकाध्यक्षपदी शेख जियाउलहक्क यांची निवड



**गंगाखेड,/प्रतिनिधी :** शहरातील बेलदार समाजाचे युवा नेते शेख जियाउलहक्क यांची बेलदार समाज संघाच्या गंगाखेड तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. परभणी येथे बेलदार समाज संघाची बैठक संस्थापक अध्यक्ष खलील बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली सदरील बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या यामध्ये गंगाखेड तालुकाध्यक्षपदी बेलदार समाजाचे जेष्ठ युवा नेते शेख जियाउलहक्क यांची गंगाखेड तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.परभणी जिल्हाध्यक्ष मगदूम बेलदार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते सय्यद जमीर,खलील बेलदार,शेख सद्दाम,चांद बेलदार,अफजल बेलदार,अन्वर बेलदार,मोबीन बेलदार, खदिर बेलदार,वसीम बेलदार आदींसह गंगाखेड बेलदार समाज संघाच्या वतीने शेख जियाउलहक्क यांव्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

### तीन महसुल विभागांना रब्बीसाठी विशेष मदत पॅकेजमधून निधी वर्ग

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील बहुतांशी जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी व पुरामुळे आपत्ती उद्भवली. त्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीपीक नुकसान, शेतजमीन खरडून जाण्यासह विरीहींचे नुकसान, मनुष्य व पशू हानी, घरांची पडझड, घरातील वस्तू साहित्याचे नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वत्रिक मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती प्राधीकरणाच्या नियमानुसार या आपदग्रस्त शेतकऱ्यांना रब्बी हंगामामध्ये बियाणे व इतर बाबींकरीता राज्य सरकारने विशेष मदत पॅकेज जाहीर करत प्रतिहेक्टरी दहा हजार रुपये अतिरिक्त मदत व अर्थसहाय्य संदर्भातील निर्णय १० ऑक्टोंबर रोजी जाहीर केला होता. त्याअनुषंगाने पुणे, नाशिक व अमरावती महसूल मंडळांतर्गत विभागीय आयुक्तांनी अतिरिक्त मदतीबाबतचे प्रस्ताव सादर केल्यानंतर महसूल व वन विभागाने या तीनही महसूल मंडळांना १७६५ कोटी २२ लाख ५५ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यास गुरुवारी मंजूरी बहाल केली. त्याप्रमाणे पुणे महसुल मंडळांतर्गत सातारा, नाशिक मंडळांतर्गत नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर, तसेच अमरावती मंडळांतर्गत अमरावतीसाठी हा निधी वर्गसुध्दा करण्यात आला आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे येत्या रब्बी हंगामाकरीता बियाणे व इतर अनुवांशिक बाबींकरीता विशेष मदतीच्या निर्णयाच्या अंमलबजावनी बाबत लक्ष लागले आहे. रब्बी हंगामा व्यतिरिक्त या शेतकऱ्यांना अद्यापही दिवाळीत वर्ग झालेले अनुदानाच्या रक्कमा खात्यात जमा झाले.

# आरटीओ’च्या आशिर्वादाने भंगारात निघालेल्या बसेसद्वारे धोकादायक वाहतूक सुरु : तिकीटांचे आव्वा की सव्वा दर : दिवाळी कॅश

**मोहन धारासूरकर**

**परभणी/प्रतिनिधी-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर म्हणजे दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये काही खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी तिकीटांच्या दरात आव्वा की सव्वा वाढ करीत प्रवाशांची बेसुमार लूट सुरु केलीच परंतु, परजिल्ह्यातून, परप्रांतातून भंगारात निघालेल्या बसेस या जिल्ह्यात प्रवाशांच्या सेवेत तैनात करीत धोकादायक वाहतूक सुरु ठेवली आहे.



प्रत्येक उन्हाळी सुट्ट्या असो, किंवा दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये खाजगी ट्रॅव्हल्स धारकांकडून तिकीटाच्या दरात आव्वा की सव्वा रक्कमेची वाढ केली जात आली आहे. त्याद्वारे, प्रवाशांची बेसुमार लूट खूलेआमपणे होत आली आहे. यावर्षीसुध्दा दिवाळीच्या सुट्ट्या जाहीर झाल्याबरोबर खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी ऑक्टोंबरचा महिना पूर्णतः कॅश करण्याकरीता चढाओढीने तिकीटांच्या दरात मोठी वाढ केली.

विशेषतः महानगरांकडून जिल्ह्यात सणा सुदीनिमित्त येणाऱ्या भूमीपुत्रांना या तिकीट दरातील वाढीचा मोठा तडाखा बसला. पुणे ते परभणी प्रत्येक प्रवाशामागे किमान १४०० ते २८०० रुपये हे सर्वसाधारणपणे तिकीटाचे दर आकारले जात होते. पुणे पाठोपाठ मुंबईचेही तिकीटांचे दर हे २२०० ते ३२०० रुपये आकारले जात होते. शनिवार व रविवार तर हे दर आणखीनच भडकत आहेत. खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी दररोजच हे दर टप्प्या टप्प्याने वाढविण्याचे धोरण अवलंबविले आहे. शनिवार व रविवार या दोन दिवसात तर पुणे असो, मुंबई, कोल्हापुर, नागपुर असो किंवा सुरतकडे जाणाऱ्या बसेसच्या दरांमध्ये प्रचंड वाढ केली जात आहे.

भंगार बसेसद्वारे धोकादायक प्रवाशी वाहतूक संपूर्ण दिवाळी सुट्ट्यांचे सीझन कॅश करण्याकरीता ट्रॅव्हल्सधारकांनी भंगारात निघालेल्या बसेससुध्दा रस्त्यावर आणून धावण्याचे धोकादायक प्रकार अवलंबविले आहेत. परभणी शहरातून स्थानिक पातळीवरुन सर्वसाधारणपणे पुणे व मुंबई करीता ४० बसेस धावत आहेत. प्रवाशांची गर्दी ओळखून या कंपन्यांनी पर जिल्ह्यातून, परप्रांतातून मोडकळीस निघालेल्या बसेस रस्त्यावर आणून धोकादायक पध्दतीने सुरु केल्या आहेत. त्यामुळे या भंगारात निघालेल्या बसेसमधून मजूरी निमित्त आलेल्या प्रवाशांना अक्षरशः कोंबल्या जात आहे.

परप्रांतीय पासींगच्या खाजगी गाड्यांचा सुळसुळाट...

अरुणाचल प्रदेश (एआरएनएल) व मध्यप्रदेश येथून पासींग करुन आलेल्या दोन बाय दोनच्या खाजगी ट्रॅव्हल्स परभणी जिल्ह्यात धावू लागल्या आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या ट्रॅव्हल्स सक्षम नसतांनाही प्रादेशिक परिवहन कार्यालयातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या साटेलोट्यातून, आशिर्वादातून हे प्रकार सर्रास सुरु आहेत. अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश पासींगच्या जवळपास ३० ते ३५ बसेस परभणी जिल्ह्यात धावत असून त्यातून मोठी उलाढाल खूलेआमपणे सुरु आहे. महाराष्ट्रात दोन बाय दोन खाजगी ट्रॅव्हल्सला बंदी आहे. त्यामुळे अशा गाड्यांची महाराष्ट्रात पासींग होत नाही, त्यामुळे परप्रांतातून अशा गाड्यांची पासींग करुन घेतली जात आहे व त्या गाड्या परभणी जिल्ह्यातून धावत आहेत.

हंगाम कॅश करण्याचा एकच चंग...

दिवाळी सुट्ट्या पूर्णतः कॅश करण्याचा संकल्प खाजगी ट्रॅव्हल्सधारकांनी सोडला असून नियमित बसेस सोडणाऱ्या कंपन्यांनी आता आपल्या ताफ्यात प्रवाशांची गर्दी ओळखून मोडकळीस निघालेल्या बसेससुध्दा दाखल करीत त्यांच्याद्वारे प्रवाशांची लूट सुरु केली आहे. या बसेसमधून कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत. विशेषतः निकृष्ट दर्जाची आसनव्यवस्था, मोडकळीस निघालेल्या खिडक्या तसेच हालणारे डुलणारे आसन, मळकट, कळकट गाद्या व त्यांचे कव्हर असे वाईट अनुभव प्रवाशी मूकपणे सहन करत आहेत. परंतु, त्याचे सोयरसुतक सरकारी यंत्रणेस नाही, हे दुर्दैव आहे. प्रवाशीसुध्दा कुठेही तक्रार न करता निमूटपणे पैसे मोजून कसबसा पल्ला गाठण्याचा धोकादायक प्रयत्न करीत आहेत.

## राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा भाजपा मध्ये जाहीर पक्षप्रवेश



### चिंचोली दराडे येथील राष्ट्रवादीचे उपसरपंच गुलाबराव दराडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी** तालुक्यातील चिंचोली दराडे येथील राष्ट्रवादीचे उपसरपंच गुलाबराव दराडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी जिंतूर येथील माजी आमदार रामप्रसाद जी बोर्डीकर यांच्या निवासस्थानी नयन स्वप्न निवासस्थानी छोटे खाणी एका कार्यक्रमात माजी आमदार परभणी जिल्ह्याचे भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे भाजप चे जिल्हा सचिव डॉक्टर पंडितराव दराडे चिंचोली दराडे येथील माजी पंचायत समिती सदस्य प्रभाकर रावजी दराडे माजी सरपंच माधवराव दराडे माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी वाटाणेअजित भोबेपाटील यांच्या उपस्थितीमध्ये चिंचोली दराडे येथील असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिट्टी देऊन भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना उपसरपंच म्हणालेकी आगामी काळात येणाऱ्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत या निवडणुकीमध्ये आम्ही ताकतीने भाजपच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार व देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहणार असा विश्वास व्यक्त केला भाजपमध्ये पक्षप्रवास करणारे चिंचोली दराडे येथील उपसरपंच गुलाबराव दराडे संतोषराव चिलगर चांमनी पांडुरंग दराडे उपसरपंच संतोष दराडे अशोकराव दराडे कैलास निवृत्ती दराडे मधुकर दराडे काशिनाथ दराडे साहेबराव दराडे ज्ञानोबा मुंडे ज्ञानदेव दराडे जगन्नाथ दराडे बालासाहेब दराडे गजानन कुटे गजानन दराडे विष्णू दराडे शिवशंकर दराडे महादू दराडे नाजुकराव पाटील यांच्यासह राष्ट्रवादीच्या असंख्य कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला आहे यावेळी पक्षांमध्ये प्रवेश करणाऱ्यांचे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर गोविंद भाऊथिटे पंडितराव दराडे भाजप युवा मोर्चा चे जिंतूर तालुका अध्यक्ष माधवराव दराडे प्रभाकर दराडे माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानरावजी वटाणेयांनी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले आहे

## सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त पोलीस दलाच्यावतीने रन फॉर युनिटी दौडला उस्फूर्त प्रतिसाद

### युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हेच उद्दिष्ट

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सरदार १५० एकता अभियान अंतर्गत या अभियानात रन फॉर युनिटी दौडचे आयोजन पूर्णा पोलीस ठाण्याच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून, शहराच्या मुख्य रस्ता, छत्रपती संभाजी महाराज चौक, गुड मॉर्निंग रोड, राजमुद्रा चौक पासून टी पॉइंट पर्यंत करण्यात आले होते. या उपक्रमात उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. समाधान पाटील, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, नायब तहसीलदार प्रशांत थारकर, क्रीडा मार्गदर्शक महेश जाधव, सज्जन जयस्वाल,विशाल चितलांगे, मुन्ना राठोड, ज्ञानोबा काटकर, विष्णू यादव, बळीराम काळबांडे आदीच्या प्रमुख उपस्थितीत रन फॉर युनिटी दौड चे शुभारंभ करण्यात



आला.यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या अभियानांतर्गत भारत सरकारच्या माय भारतच्या नेतृत्वाखाली सरदार१५० युनिटी मार्च या देशव्यापी उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. याचे उद्दिष्ट देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून एक भारत, आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास शहरातील टी पॉइंट पर्यंत करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून एक भारत, आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल. या उपक्रमाद्वारे युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे, तसेच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत युवा पिढीला सक्रिय योगदान देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या उपक्रम यशस्वीसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमन

### श्रीमती मीरा कोटीखाने यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील वसमत रस्त्यावरील विवेक नगरातील ज्येष्ठ नागरिक मीरा रमेश कोटीखाने यांचे शनिवारी सकाळी ११.३० वाजता परभणीतील एका खाजगी रुग्णालयात वृध्दापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा अॅड. रोहित कोटीखाने, विवाहित कन्या, नातू असा परिवार आहे. दरम्यान, श्रीमती कोटीखाने यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कपडे धुतांना दोन बहिणी बुडाल्या

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तलावात कपडे धुण्यासाठी गेल्या असता दोन सख्या बहिणी बुडाल्या. यात एकीचा मृत्यू झाला तर दुसऱ्या बहिणीची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना जिंतूर तालुक्यातील कुन्हाडी शिवारात गुरुवार ३० ऑक्टोबर रोजी दुपारी घडली.

**जिंतूर तालुक्यातील कुन्हाडी येथील घटना, दुसऱ्या बहिणीची प्रकृती गंभीर**

सातपुर नाशिक येथे वास्तव्यास असलेले परमेश्वर बारकीराम चव्हाण हे कुटुंबासह नातेवाईकाच्या लग्नासाठी कुन्हाडी येथे आले होते. गुरुवारी दुपारी त्यांची मुलगी पूजा परमेश्वर चव्हाण वय २० वर्ष, दुसरी मुलगी संध्या परमेश्वर चव्हाण वय १७ या दोघी कपडे धुण्यासाठी गावाशेजारील तळ्यावर गेल्या होत्या. यावेळी दोघींचा पाय घसरून दोघी तळ्यात पडल्या. या ठिकाणी असलेल्या महिलांनी आरडाओरड केली. गावातील नागरीक धावून आले. त्यांनी सदर बहिणींना तळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला. थोड्या वेळात पूजा सापडली तिला ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. अर्ध्या तासाच्या शोध मोहिमेनंतर संध्या देखील मिळून आली. ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. पारवे यांनी तिला तपासून मयत घोषीत केले. यावेळी रुग्णालय परिसरात नातेवाईकांनी गर्दी केली होती.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांचा पाठपुरावा यशस्वी; परभणी विभागासाठी नवीन सी-बँड रडार मंजूर

**परभणी,/प्रतिनिधी-** केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी पत्राद्वारे मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी विभागात नवीन सी-बँड रडार बसविण्याचा प्रस्तावही केंद्र सरकारने मंजूर केला असल्याचे कळविले आहे.

अत्याधुनिक डॉपलर वेदर रडार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व पाणी पुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पाठपुराव्यानंतर मराठवाड्यात हवामान अंदाजासाठी अत्याधुनिक डॉपलर वेदर रडार () बसविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी भागात आणखी एक नवीन सी-बँड रडार डॉ. जितेंद्रसिंह यांनी पाठविलेल्या पत्रात पुढे नमूद केले आहे की , सोलापूर येथे आधीपासून कार्यरत असलेला २५० कि.मी. परिघाचा डॉपलर रडार सध्या परभणी आणि नांदेड परिसरातील हवामान निरीक्षणासाठी वापरला जात आहे. तसेच 'मिशन मौसम' योजनेअंतर्गत परभणी भागात आणखी एक नवीन सी-बँड रडार बसविण्याचा प्रस्तावही केंद्र सरकारने मंजूर केला आहे. शेतकऱ्यांना वेळेवर हवामानाची अचूक माहिती मिळणार

राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सांगितले की,मराठवाडा हा दुष्काळप्रवण प्रदेश असून शेतकऱ्यांना वेळेवर हवामानाची अचूक माहिती मिळावी यासाठी हा उपक्रम अत्यंत आवश्यक होता. केंद्र सरकारकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आता हवामान अंदाजासाठी आपली क्षमता अधिक बळकट होईल. म्हैसमळ टेकडी, छत्रपती संभाजीनगर येथे सी-बँड प्रकारचा २५० कि.मी. परिघाचा रडार राज्यमंत्री साकोरे बोर्डीकर यांनी केंद्र सरकारकडे परभणी येथे हवामान निरीक्षणासाठी डॉपलर रडार बसविण्याची मागणी केली होती. त्यासंदर्भात केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी कळविले आहे की , म्हैसमळ टेकडी, छत्रपती संभाजीनगर येथे सी-बँड प्रकारचा २५० कि.मी. परिघाचा रडार बसविण्याचे काम सुरू आहे. या केंद्रामुळे मराठवाडा विभागातील हवामान निरीक्षण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केंद्र सरकारचे मानले अभार या निर्णयामुळे मराठवाड्यातील शेती, पिक संरक्षण, हवामान पूर्वसूचना व आपत्ती व्यवस्थापनाला मोठा हातभार लागणार असल्याने राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केंद्र सरकारचे अभार मानले आहे.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जालना-नांदेड समृद्धी महामार्गातील बाधीत शेतकऱ्यांचे आंदोलन



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ नोव्हेंबर-**

जालना नांदेड समृद्धी महामार्गातील नांदेड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यानी समृद्धी महामार्ग करण्यासाठी आणलेल्या यंत्र सामुग्री वर चढून आमच्या मागण्या पूर्ण होई पर्यंत समृद्धी महामार्ग रस्त्याचे काम होऊ देणार नाही असा इशारा समन्वयक शेतकरी समितीने २ नोव्हेंबर रोजी दिला असुन आलेली यंत्र सामुग्री काढून दिली आहे.

शासनाला प्रशासनाला आपल्या विविध मागण्या बाबत मागील तीन वर्षापासून सतत पाठपुरावा करून विनंती करून आपल्या पदरात काहीही दिलेले नाही. आपल्या जमिनी कवडीमोल भावाने संपादित करीत आहेत,आपले प्रामुख्याने वास्तव बाजारभावाप्रमाणे जमिनीचे मूल्यांकन करून सानुग्रह अनुदान पद्धतीने मावेजा देण्यात यावा, सर्व्हिर्स रोड,आपले अवार्ड मधील राहिलेले हक्काचे बारा टक्के व्याज मिळणे, या व इतर मागण्या संदर्भात अतिशय महत्त्वाची बैठक दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बाबुळगाव फाटा तालुका नांदेड येथे सर्व शेतकरी बांधवांची बैठक येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी

दिनांक २८ ऑक्टोबर २५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व तीन जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे मीटिंग झाली त्यामध्ये जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत तेथील शेतकरी व लोकप्रतिनिधींनी मागणी लावून धरल्यामुळे त्यांचे प्रस्ताव पाठवण्यासाठी सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे आपल्यालाही आपल्या वरील मागण्या पूर्ण करण्यासाठी व त्याबाबत पुढील निर्णय घेण्यासाठी बैठक घेण्यात आली, या बैठकीला दासराव हंबर्डे,अशोक मोरे,दीपक पाटील,माजिद शेठ,माधव कदम,राहुल वाघ, यांच्या सह अनेक गावांतील शेतकरी समन्वयक शेतकरी कृती समिती, जालना नांदेड समृद्धी महामार्ग सहभागी झाले होते.

यावेळी महामार्ग साठी आलेल्या यंत्र सामुग्री वर चढून संतप्त शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करून जो पर्यंत मागण्या मान्य होणार नाही तो पर्यंत कामकाज बंद करण्याचा इशारा समन्वयक शेतकरी यांनी दिला आहे. संतप्त शेतकऱ्यांनी आलेली यंत्र सामुग्री काढून देऊन जय जवान जय किसान घोषणा दिल्या.

# सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यास परवानगी द्यावी : आ. केराम




**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २ नोव्हेंबर-**

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी महाराष्ट्र शासनातील पणन तथा राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांना निवेदन देऊन किनवट तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवट (जि. नांदेड) येथे सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे.

आ. केराम यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, किनवट व माहूर तालुक्यातील बहुतांश शेतकरी सोयाबीन पिकाचे प्रमुख उत्पादक आहेत. निसर्गाच्या अस्मानी-सुलतानी संकटांवर मात करत शेतकऱ्यांनी यंदा आपल्या पिकाची काढणी पूर्ण केली आहे. मात्र शासनाच्या हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र आजपर्यंत सुरु न झाल्यामुळे व्यापारी शेतकऱ्यांकडून कवडीमोल भावात सोयाबीन खरेदी करून त्यांची आर्थिक पिळवणूक करत असल्याची खंत आमदार केराम यांनी व्यक्त केली आहे.

किनवट हे आदिवासी व दुर्गम क्षेत्र असल्यामुळे येथील शेतकऱ्यांना शासकीय खरेदी केंद्राची विशेष आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. किनवट कृषी उत्पन्न बाजार समिती ही क वर्गातील असून, खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी मागील तीन वर्षांची किमान तीन कोटी रुपयांची उलाढाल दाखविण्याची अट असल्याने समितीस खरेदी केंद्र सुरु करणे शक्य होत नाही. त्यामुळे शासनाने ही अट शिथिल करावी, अशी विनंतीही आमदार केराम यांनी केली आहे.

आमदार केराम यांनी यावेळी हेही स्पष्ट केले की, समितीने सन २०१७ पासून नियमित खरेदी केंद्र चालविले असून, वर्ष २०२४-२५ मध्ये तब्बल ३२,४२६ क्विंटल सोयाबीन खरेदी केली आहे. त्यामुळे समितीच्या कामकाजाची विश्वासार्हता लक्षात घेऊन शासनाने तातडीने परवानगी द्यावी.

याबाबत बोलताना आमदार केराम म्हणाले की, किनवट व माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा सोयाबीन पिक हा त्यांच्या उत्पन्नाचा मुख्य आधार आहे. व्यापाऱ्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबवून शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळावा, यासाठी खरेदी केंद्र सुरु होणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे आदिवासी व शेतकरीवर्गाच्या हितासाठी शासनाने किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीस तातडीने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्याची परवानगी द्यावी, अशी आमदार केराम यांची मागणी आहे. यावेळी भाजपा नेते जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे यांची देखील उपस्थिती होती.

## सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त सोनखेड पोलीस दलाकडून एकता दौड

## जांब गटातून जयपाल गायकवाड यांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जांब** -जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जांब गटात जयपाल गायकवाड यांचे नाव जोरदार चर्चेत आले आहे. गायकवाड यांनी अलीकडेच हिप्परगा, दापका राजा आणि लादगा येथे घेतलेल्या संवाद दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे स्वागत करत काँग्रेसला पाठिंबा दर्शविला. जांब गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून, या वेळी स्थानिक उमेदवाराचा मुद्दा ठळक झाला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी स्थानिक पातळीवरून उमेदवारीसाठी नावे मागवली होती, त्यात उच्चशिक्षित आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत जयपाल गायकवाड यांचे नाव पुढे आले आहे. गायकवाड यांच्या संपर्क दौऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत असून, स्थानिक युवा चेहरा आणि प्रामाणिक प्रतिमा या बळावर काँग्रेसला जांब गटात गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप व इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे गायकवाड यांच्या प्रचाराला जांब गटात सुरुवातीपासूनच वेग आला आहे.

# लिंग निदान प्रतिबंधक कायदा कठोर करा, परंतु डॉक्टरांप्रती समन्वयाची भूमिका आवश्यक : खा. डॉ. अजित गोपछडे




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ नोव्हेंबर-**

स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेला लिंग निदान प्रतिबंधक कायदा (झउझछछऊ लीं) अधिक कठोर व्हावा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केली आहे. परंतु याचवेळी अकारण निष्पाप डॉक्टरांवर गुन्हे दाखल होणार नाहीत, त्यांचे मानसिक खच्चीकरण होणार नाही, यासाठी डॉक्टरांप्रतीही समन्वय आणि संवेदनशीलता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री श्री जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत झालेल्या केंद्रीय पर्यवेक्षक मंडळाच्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी ही सूचना मांडली.

बैठकीत पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय चौकटीचा आढावा घेण्यात आला. बेकायदेशीर लिंग निवड रोखण्यासाठी ठोस धोरणांवर, राज्य पर्यवेक्षी मंडळांशी समन्वय वाढवणे आणि तांत्रिक माध्यमांतून देशभरातील निदान केंद्रांवर रिअल-टाइम देखरेख प्रणाली लागू करण्यावर भर देण्यात आला.

या वेळी बोलताना खा. डॉ. गोपछडे म्हणाले, लिंग-आधारित गर्भ निवड हे केवळ सामाजिक नव्हे तर राष्ट्रीय आव्हान आहे. या विकृतीला आळा घालण्यासाठी प्रत्येक स्तरावर कठोर दक्षता, पारदर्शकता आणि जबाबदारी आवश्यक आहे. जन्म घेण्याचा अधिकार हा प्रत्येक मानवाचा सर्वात मूलभूत आणि पवित्र अधिकार आहे. कोणतेही तंत्रज्ञान, प्रक्रिया किंवा प्रणाली या अधिकाराचे उल्लंघन करणार नाहीत याची खात्री करणे हे आपले नैतिक तसेच मानवी कर्तव्य आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, केंद्र सरकार आणि पर्यवेक्षक मंडळ हे कायदे, जनजागृती आणि संस्थात्मक जबाबदारी यांच्या माध्यमातून समाजातील ही खोलवर रुजलेली दुष्प्रवृत्ती संपवण्याच्या मोहिमेवर आहेत.

डॉ. गोपछडे यांनी जनजागृती मोहिमा अधिक तीव्र करण्याची, कायद्याची अंमलबजावणी मजबूत करण्याची आणि निदान केंद्रांसाठी प्रभावी तंत्रज्ञानाधारित निरीक्षण व्यवस्था उभारण्याची गरज व्यक्त केली. तसेच, अनेक वेळा डॉक्टरांचा दोष नसतानाही त्यांच्यावर कारवाई केली जाते, हे वास्तव लक्षात घेऊन असली गुन्हेगार आणि सेवा-भावनेने काम करणारे डॉक्टर यांच्यात फरक ओळखण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

## इच्छुक उमेदवार अंकुश भालेराव यांच्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण!

**किनवट** -गोकुंदा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले अंकुश भालेराव यांनी आपल्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण केला आहे. गणातील विविध गावांना भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या गावांमध्ये झाला दौरा: पहिल्या टप्प्यात अंकुश भालेराव



यांनी गणातील महत्त्वाची गावे असलेल्या गोकुंदा, कोठारी, शनिवारपेठ, प्रधानसांगवी, बेंदी, बेदी तांडा, आणि आमडी या गावांना भेटी दिल्या. उद्देश आणि प्रतिसाद: या दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या, मूलभूत गरजा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. या भागातील नागरिकांनी श्री. अंकुश भालेराव यांचे उत्साहाने स्वागत केले आणि त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. पुढील टप्प्याची तयारी: पहिल्या टप्प्याला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर, आता अंकुश भालेराव लवकरच दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करणार असल्याचे त्यांच्या कडून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगण्यात आले. उर्वरित गावांमध्ये भेट देऊन ते आपला जनसंपर्क वाढवणार आहेत. अंकुश भालेराव यांच्या या सक्रिय जनसंपर्क अभियानामुळे गोकुंदा पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

# नरसी गटात कमलबाई गायकवाड पुन्हा मैदानात; विरोधकांच्या गोटात खळबळ!

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २ नोव्हेंबर-**

नांदेड जिल्हा परिषदेच्या माजी समाजकल्याण सभापती कमलबाई जयवंतराव गायकवाड या आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत नरसी गटातून पुन्हा मैदानात उतरण्याच्या तयारीत असून, त्यांच्या राजकीय पुनरागमनाने विरोधकांच्या गोटात चांगलीच खळबळ माजली आहे.



मागील कार्यकाळात कमलबाई गायकवाड यांनी समाजकल्याण विभागांतर्गत अनेक शासकीय योजना प्रभावीपणे राबवून सामान्य जनतेच्या मनात स्थान निर्माण केले. दलित, वंचित घटक, तसेच महिला वर्गात त्यांचा प्रभाव आजही ठळकपणे जाणवतो. त्यांनी ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबनाकडे नेण्याचे काम केल्याने त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

दरम्यान, नरसी गटात सध्या अनेक इच्छुकांची लगबग दिसत असली तरी गायकवाड यांच्या पुनरागमनाने सर्व राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या समर्थकांनी आधीच गायकवाड पुन्हा जिल्हा परिषदेत असा नारा देत प्रचारयंत्रणा सुरू केली आहे. गटातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत असून, स्थानिक पातळीवर गायकवाड यांना मजबूत कार्यकर्त्यांचा पाठिंबा लाभत आहे.

कमलबाई गायकवाड या दलित मित्र जयवंतराव गायकवाड यांच्या सौभाग्यवती आहेत. जयवंतराव गायकवाड यांनी मागील ३५ वर्षांपासून किनाळा ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून नेतृत्व करत गावाच्या सर्वांगीण विकासाची नवी दिशा दिली. तसेच शिक्षण क्षेत्रात त्यांच्या संस्थांचे योगदान भरीव असून, या दाम्पत्याने समाजकारणासोबतच शिक्षण व सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधला आहे.

राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, गायकवाड दाम्पत्याच्या संघटकीय ताकदीमुळे आणि सामाजिक स्वीकारार्हतेमुळे विरोधकांना यावेळी चांगलीच धावपळ करावी लागणार आहे.



**मुखेड- आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या प्रमुख उपस्थिती मुखेड विधानसभा मतदारसंघातील पाच मंडळातील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व सुपर वॉरियर्स आणि कार्यकर्त्यांची आर्य वैश्य मंगल कार्यालय मुखेड येथे बैठक पार पडली. या बैठकीत प्रहार जनशक्ती पार्टीचे मुखेड शहराध्यक्ष साईनाथ बालाजी बोईनवाड यांच्यासह त्यांच्या पक्षातील विविध कार्यकर्ते आज भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यामध्ये संतोष घाळेवाड, बालाजी भांगे, प्रवीण मारकवाड, संभाजी मुद्देवाड, सतीश गुडमेवाड, राहुल कंदमवार, युवा शहराध्यक्ष बालाजी मंगेवाड, सचिन मंगेवाड, साईनाथ भांगे, ऋषिकेश महाले, गजानन उमाटे, नरेश पाटील इंगोले, रामेश्वर पांचाळ, अविनाश मेहकर संतीष मेहकर, बालाजी कोत्तापल्ले, गजानन गोरलावाड, गजानन चिंतमवाड, कैलास मरकेलवाड, शंकर मरकेलवाड, अंकुश गोरलावाड, मंगेश गोरलावाड, साईनाथ उल्लेवाड, श्रीकांत उल्लेवाड, रामराव चिंतामवाड, रवी पोतलवाड, गणेश सूकेवार, अशोक हादवे, चंद्रकांत बोईनवाड, गजानन भांगे, संजय दामेकर, करण बोईनवाड, अजय बोईनवाड, गंगाधर बोईनवाड, महादेव डांगे, शिवम रोडेवार, अनिल उल्लेवाड, गजानन भांगे आदीसह मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.**

चे अध्यक्ष तथा मुखेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शिवाजी नागोराव जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त शिवरायनगर मालेगाव रोड तरोडा खुर्द येथील त्यांच्या निवासस्थानी मित्रमंडळीसह राजकीय पक्षातील नेते



पदाधिकारी, पत्रकारांनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील एक प्रभावी आणि आदर्श अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले शिवाजीराव जाधव उमरदरीकर, सर्व परिचित असल्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आदी सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून व व्हाट्सअप, च्या माध्यमातून शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, माजी आ.मोहन अण्णा हंबर्डे, एकनाथराव कल्याणकर, नांदेड अभिवक्ता संघाचे मा. अध्यक्ष अँड.सतीशराव पुंड,अँड. विजयकुमार भोपी,किसनराव कल्याणकर, माधव पावडे, पप्पू जाधव,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, प्रा.डी.बी जांभरुणकर, नेताजीराव भोसले,प्रा. मजरोद्दीन, माधवराव कल्याणकर, नारायणराव गायकवाड, सुभाषराव रावणगावकर, शिवसेनेचे शंकरराव लुटे बालासाहेब मादसवाड,प्रा.सौ. प्रांजली रावणगावकर, अँड. बाळासाहेब मोरे, शकुंतला पब्लिक स्कूलचे अध्यक्ष गिरीषराव जाधव, प्रा.यशवंत कांबळे, पांपटवार, चंद्रकांत घाटे,अँड. लक्ष्मण सोमवारे ,राष्ट्रवादी काँग्रेसचे, मुखेड विधानसभा अध्यक्ष शंकरराव इंगळे, स. रणबीरसिंग खोकर, स.टहेलसिंग शाहू, स.नानसिंग घडीसाज, स.नारायणसिंग तबलेवाले,स.प्रेम्जितसिंग टेलर, स.गरूबचनसिंग बंड, स.अजितसिंग मंचरियालवाले,शिवकुमार देवकते, सुरेश चंदावाड, शादुल होणवडजकर, कैलास मादसवाड, प्रा.डॉ. गणेश जोशी, डॉ. अभय दांडगे, रमेश पांडे, रमेश चित्ते, प्रशांत गवळे,विजय मंगरुळे, श्रीधरराव कदम, योगगुरू सिताराम सोनटक्के, किशोर पसलवाड, मंगेश खंडागळे, आर.आर.यवतीकर, अबास काझी, विकास गजभारे,जीवन वडजे पाटील यांच्यासह नवीन नांदेड, नांदेड व उमरदरी येथील त्यांच्या संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आदी शेकडो हितचिंतकांनी शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

# कै. आ.बाबासाहेब देशमुख गोरठकर यांच्या सुपुत्राचा काँग्रेस मध्ये प्रवेश



**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्यात गोरठेकर ब्रॅन्ड म्हणू गाजत असतांना तत्कालीन विलासराव देशमुख यांचे सरकार वाचवणारे कै . आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांचे सुपुत्र पांडूरंग बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांनी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश करून पत्रकार परिषेदेत स्वतः ची भुमिका मांडली असल्याने उमरी च्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

पांडूरंग देशमुख गोरठेकर हे कै बाबासाहेब देशमुख यांचे राजकीय व कौटुंबीक वारस आहेत त्यांनी अठरा पगड जातीला घेवून समाज आणि राजकारण करतात त्यांनी महाराष्ट्र प्रदेश व जिल्हा स्तरावर छावा संघटना अशा सामाजिक संघटना व राजकीय संटनेत कार्य करून समाजाला न्याय देण्याचे काम केले आहे. कै . बाबासाहेब देशमुख गोरठेकर व कै बापूसाहेब देशमुख यांच्यासह गोरठेकर घराण्याचा आदर करीत कौटुंबीक सलोखा सोडून राजकारणात व्यक्तीक छाप टाकली आहे. पांडूरंग देशमुख यांचे शहरात व तालुव्यात सत्तेत नसले तरी बऱ्यापैकी निर्भीड कणखर राजकीय नेतृत्व म्हणून दबदबा आहे त्यांनी अठरापगड समाजाच्या हितासाठी अन्यावर मात करून स्वतःला गुन्हेगारीत अडकडून घेवून अजून ही लढा चालू ठेवला आहे .

कॉग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असून छपत्रपती शिवाजी महाराज , फुले शाहू आंबेडकर विचार धारेचा पक्ष असल्याने मी माझे कार्यकर्ते कॉग्रेस पक्षात देगलूर येथे खा . रविद्र पाटील चव्हाण याच्या विश्वासावर व विकासाच्या बळावर जाहीर प्रवेश केल्याचे ही पत्रकार परिषेदेत स्पष्ट केले आहे .

राजकारणात सत्तेसाठी राष्ट्रीय पातळीवर बईमानी होत असल्याने आमच्या सारख्या निष्टावंत सामान्य कार्यकर्त्यांची गोची होत असल्याने मी कॉग्रेस पक्ष प्रवेश केला आहे.

खासदार रविंद्र पाटील चव्हाण यांनी उमरी नगरपरिषद, जि. प. पंचायत समिती निवडणूकी संदर्भात जो निर्णय आदेश देतिल ती पात्रता समजून मी सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाचे कार्य करणार आहे. नगर परिषद व जिल्हा परिषद गटामधून पक्षाने तिकीट दिल्यास निवडणूक लढविणार असल्याची भुमिका पांडूरंग देशमुख गोरठेकर यांनी व्यक्त केली आहे . गोरठेकर घराण्यात फुट का ? असे विचारले असता त्यांनी जाच्यी मर्जी मला त्या बंधू व घराण्याच्या कोणाच्या विरोधात बोलू शकत नाही माझ व्यक्तिक मत आहे. उमरी विकास खासदार रविंद्र पाटील चव्हाण यांच्याकडून होऊ शकतो म्हणून पक्ष प्रवेश केला आहे. येणारा निवडणुकीचा काळ सत्ता कोणाच्या हाती देईल हे जनता माय - बाप ठरवतील असे ही देशमुख म्हणाले आहेत.

यावेळी पत्रकार परिषेदेत जेष्ट नेते गोविंदराव सिंधीकर, बालासाहेब पाटील हातणीकर, प्रकाश पाटील चिंचाळकर, दासराव पाटील शिंदे शिरूरकर , संचालक केसगीरे पाटील कळगावकर, गजानन आलगुलवाड, माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे, पापा कावळे , माहिती अधिकार तालुकाध्यक्ष संदीप गोवंदे , शोख शकिल ,धोंडजी पाटील गोरठेकर ,दताहारी पाटील लोहरे , दिनकर भंडारे ,अन्य मान्यवर उपस्थित होते

# देगलूरात आज भारतीय जनता पक्षाची जनसंवाद सभा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पक्षातर्फे शहरात आज ३ नोव्हेंबर रोजी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेला राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. अशोक चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ही सभा शहरातील मोंढा मैदानावर सकाळी ११.०० वाजता पार पडणार आहे. या जनसंवाद सभेला राज्यसभेचे विद्यमान खा. डॉ. अजित गोपछडे, विभागीय संघटनमंत्री संजय कौडगे, आ. जितेश अंतापूरकर, आ. भिमराव केराम, आ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, आ. श्रीजयाताई चव्हाण, माजी आमदार अमरनाथ राजूरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे यांच्यासह अनेक जण उपस्थित राहणार आहेत.

**नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर होण्याची शक्यता**

ही जनसंवाद सभा पक्षाची ध्येय-धोरणे, जनतेच्या अपेक्षा, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरणार आहे. देगलूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचा उमेदवार या सभेत जाहीर होण्याची दाट शक्यता असल्याने नागरीकांत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. तसेच प्रतिस्पर्धी पक्षाच्या नेत्यांची नजर सुध्दा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या घोषणेकडे लागली आहे. या सभेतून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार घोषित केले जाणार की उमेदवार म्हणून चित्र स्पष्ट होणार, हे या सभेनंतरच कळेल.

या जनसंवाद सभेत पक्षाच्या आगामी रणनितीबाबत मार्गदर्शन, स्थानिक प्रश्नांवरील चर्चा तसेच कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे सांगण्यात येते. याप्रसंगी देगलूर शहर व ग्रामीण भारतीय जनता पक्षाच्या वतीने सर्व नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.